Made with Xodo PDF Reader and Editor

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २५७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### अंबाबाई चरणी तब्बल २ कोटी ४४ लाख रुपयांचे दान

**कोल्हापूर :** करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील दानपेट्यांची मोजणी पूर्ण झाली असून, अवघ्या दोन महिन्यांच्या कालावधीत भाविकांनी देवीच्या चरणी मोठ्या प्रमाणात दान अर्पण केल्याचे समोर आले आहे. मंदिर प्रशासनाच्या माहितीनुसार, दोन महिन्याच्या कालावधीत दहा दानपेट्यांमधून तब्बल २ कोटी ४४ लाख रुपये इतकी रक्कम जमा झाली आहे. श्री अंबाबाई देवीच्या दर्शनासाठी राज्यासह देशभरातून दररोज हजारो भाविक मंदिरात येतात. सण–उत्सव, शुक्रवार तसेच सुट्टीच्या दिवशी भाविकांची संख्या लक्षणीय वाढते. याच कालावधीत भाविकांनी रोख रक्कमेसह नाणी, मौल्यवान वस्तूही देवीच्या चरणी अर्पण केल्या आहेत.

### दादरमध्ये ठाकरे विरुद्ध राणे

**मुंबई :** मुंबई महानगर पालिकेसाठी निलेश राणेंवर मोठी जबाबदारी सोपवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात निलेश राणेंवर मोठी जबाबदारी सोपवली जाणार आहे. वरळी, लालबाग, माहीम, शिवडी, दादर या मराठीबहुल भागात निलेश राणेंची तोफ धडाडणार आहे. लवकरच शिवसेनेचे स्टार प्रचारक जाहीर होणार असून त्यात निलेश राणे स्टार प्रचारक असणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

### आघाडीसाठी राऊतांचा राहुल गांधींना फोन

**मुंबई :** काँग्रेससोबत आघाडीसाठी संजय राऊतांनी थेट दिल्लीत राहुल गांधींना फोन केला. राज्यातील काँग्रेस नेत्यांना डावलून आघाडीसाठी काँग्रेससोबत चर्चा काँग्रेसला सोबत घेण्यासाठी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रयत्न सुरूच आहेत. संजय राऊतांची राहुल गांधींशी फोनवरुन चर्चा झाली आहे. आघाडीबाबत चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### पोलीस महासंचालकपदी सदानंद दाते?

**मुंबई :** एनआयएप्रमुख सदानंद दाते यांना महाराष्ट्र केडरमध्ये पाठवण्यात आलंय. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने सदानंद दाते यांची मुदतपूर्व प्रतिनियुक्ती समाप्त करून त्यांना मूळ कॅडरमध्ये परत पाठवण्यास तात्काळ मंजुरी दिली. नियुक्ती समितीच्या सचिवालयाकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्रानुसार, गृह मंत्रालयाने सादर केलेल्या प्रस्तावानंतर हा निर्णय घेण्यात आला. २६/११ च्या मुंबईवरील हल्ल्यात दहशतवाद्याविरोधात लढण्यात दातेंनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. डीजीपी रश्मी शुक्ला यांचा कार्यकाळ लवकरच संपणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस महासंचालकपदी दातेंची वर्णी लागण्याची शक्यता आहे.

### दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार

**पुणे :** आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) हे दोन्ही पक्ष महापालिका निवडणुकीसाठी एकत्र लढणार असल्याची माहिती अजित पवार गटाचे शहराध्यक्ष सुभाष जगताप यांनी दिली. सुभाष जगताप यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले की, दोन्ही गटांच्या वरिष्ठ नेत्यांची रात्री महत्त्वाची बैठक पार पडली. यामध्ये सामंजस्याने आणि एकमेकांच्या मदतीने निवडणूक लढवण्यावर चर्चा झाली. यापुढची चर्चा शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अंकुश काकडे आणि वंदना चव्हाण यांच्यासोबत होईल असे सुभाष जगताप यांनी सांगितले.

### माजी आयपीएस अधिकाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**पटियाला :** पंजाबचे माजी पोलिस महानिरीक्षक अमर सिंग चहल यांनी पटियाला येथे स्वतःवर गोळी झाडून घेतल्याची भयंकर घटना घडली आहे. त्यांना तात्काळ पटियाला येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. घटनास्थळी एक सुसाईड नोटही सापडली आहे. पोलिस अधीक्षक (शहर) पलविंदर सिंग चीमा यांच्या म्हणण्यानुसार, घटनास्थळावरून पोलिसांना एक सुसाईड नोट देखील सापडली आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे. याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, माजी पोलिस महानिरीक्षक (आयजी) यांच्या छातीत गोळी लागली आहे.

### चुलत सासऱ्यानेच केला अत्याचार

**पालघर :** पालघरच्या मनोर जवळील वारली हाट कला दालन प्रकल्पात अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पती–पत्नीतील वादातून एक महिला जिथं आधार घ्यायला गेली, तिथंच तिच्यावर अत्याचार करण्यात आले. या पती–पत्नीमध्ये वाद झाला होता. पती मारहाण करेल या भीतीने महिला रात्रीच्या वेळी घराशेजारील वारली हाट कला दालन प्रकल्पात लपून बसली. दिल्ली हाटच्या धर्तीवर वारली हाट कला दालनाची संकल्पाना आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून हे दालन रखडलं आहे. येथील वॉचमनने महिलेवर बलात्कार केल्याचा प्रकार समोर आला आहे.

# मुंबईला येणारी बस सिनेस्टाईलने लुटली

## मध्यरात्रीच भुताचा माळमध्ये गेम; ४२० सेकंदात लुटले सव्वा कोटींचे दागिने

**कोल्हापूर :** कोल्हापूर–मुंबई बसवर मध्यरात्री सिनेस्टाईल दरोडा पडला. किणी गावाजवळ, भुताचा माळ परिसरात ७–८ दरोडेखोरांनी चाकूचा धाक दाखवून बस लुटली. यात सुमारे सव्वा कोटी रुपयांची चांदी, सोने व इतर वस्तू लुटण्यात आल्या. प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण असून, निवडणुकीच्या चर्चे ऐवजी आता या दरोड्याचीच चर्चा सुरू आहे. पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पहाटे मुंबईला येणाऱ्या बसवर दरोडा पडल्याची वार्ता कानावर पडल्यापासून गावकरी सुन्न झाले आहेत. चाकूचा धाक दाखवून सात आठ जणांनी बस लुटली. तब्बल सव्वा कोटी रुपयांचा मुद्देमाल घेऊन चोरांनी पोबारा केला. त्यामुळे एकच खळबळ उडाली असून गावकऱ्यांच्या तोंडी आता निवडणुकीऐवजी या दरोड्याची चर्चा ऐकायला मिळत आहे.

ही बस कोल्हापूरहून मुंबईला सायनला जाणार होती. पुढे सायनवरून भायखळ्याला जाणार होती. अशोका कंपनीची ही खासगी आराम बस होती. पण कोल्हापूरच्या किणी गावात काल मध्यरात्री १२ वाजता सात ते आठ अज्ञातांनी चाकूचा धाक दाखवून मोठी लूट केली. बसचा सिनेस्टाईलपाठलाग करून ही लूट करण्यात आली. या सर्व प्रकाराने सर्वच हादरून गेले आहेत. बस चालकांमध्येही भीतीचं वातावरण निर्माण झालं असून खासगी बस कंपन्यांची डोकेदुखी वाढली आहे.

कोल्हापुरातून मुंबईकडे जाणारी अशोका कंपनीची खाजगी आराम बस क्र.चक ०९ ऋ्ग ७२७२ ही ही रात्री अकराच्या दरम्यान कोल्हापुरातून मुंबईकडे जाण्यासाठी निघाली. तावडे हॉटेल जवळ तीन अनोळखी व्यक्ती बसमध्ये बसले. ही बस पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील किणी गावच्या हद्दीतील भुताचा माळ परिसरात आली असता बसमधील




तिघांनी चाकूचा धाक दाखवून बस रस्त्याच्या कडेला थांबवली. पाठीमागून पाच ते सहा अनोळखी लोक सिनेस्टाईलने बसचा पाठलाग करत आले. हे पाच सहाजणही थांबलेल्या बसमध्ये चढले आणि त्यांनी अरेरावीला सुरुवात केली.

या सर्वांनी बसमधील सुतळी बारदानातील ३४ किलो वजनाची चांदी, प्लॅस्टिक पोत्यातील २६ किलो वजनाची चांदी, मशिनरीचे स्पेअर पार्ट आणि दहा ग्रॅम सोन्याचे दागिने, तसेच एक मोबाईल हँडसेट असा सुमारे असा सुमारे १ कोटी २२ लाख १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल घेऊन पसार झाले. पसार होताना संशयित दरोडेखोरानी बस चालक आणि प्रवाशांना या हद्दीत थांबायचं नाही, नाहीतर जीवानिशी मारून टाकू, अशी धमकी दिली. त्यामुळे बिथरलेल्या बस चालकांनी बस पुढे नेली. त्यानंतर बस चालकाने सांगली जिल्ह्यातील कणेगाव इथं थांबून सांगली जिल्ह्यातील ११२ क्रमांकावर फोन करून सांगली पोलिसांना सर्व हकीकत सांगितली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणाची अधिक माहिती घेतली जात असून पोलीस तपास करत आहेत.

# ठाकरे बंधूंच्या युतीची आज घोषणा

**मुंबई :** राज्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडणार असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या युतीवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. मनसे आणि ठाकरे

### खा. संजय राऊत यांनी ट्विट करुन दिली माहिती; आज होणार घोषणा

गटाची युती उद्या दुपारी १२ वाजता अधिकृतपणे जाहीर केली जाणार आहे. या युतीच्या घोषणेमुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. दोन्ही पक्षांच्या नेत्यांकडून संयुक्त पत्रकार परिषदेत युतीची घोषणा होणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

आगामी मुंबईसह ठाणे आणि इतर महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीबाबत मागील काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. मुंबईतील काही जागांवरून शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांच्यात वाद निर्माण झाल्याची चर्चा होती. अशातच आता ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी मोठी अपडेट दिली आहे. शिवसेना ठाकरे



गटाचे नेते संजय राऊत यांनी ट्वीट करून युतीच्या घोषणेचा दिवस आणि वेळ जाहीर केली आहे.

शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांची युती निश्चित झाली असून काल (२२ डिसेंबर) रात्री झालेल्या बैठकीत जागा वाटपावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याचे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी सकाळी माध्यमांशी बोलताना सांगितले होते. नाशिक, पुणे, कल्याण–डोंबिवली, मीरा–भाईंदर, ठाणे आदी महापालिकांमधील जागा वाटपांबाबत दोन्ही पक्षांमध्ये एकमत झाल्याचे दिसून आले आहे.

मराठीबहुल जागांवर रस्सीखेच सुरू असल्याची चर्चा सुरू होती. यामध्ये शिवडी, वरळी, माहिम–दादर, दिंडोशी, भांडुप या विभागाचा समावेश होता. अखेर भागातील जागा वाटपावर तोडगा काढण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

उद्धव आणि राज ठाकरे हे कुटुंब म्हणून पुन्हा एकत्र आले आहेत. राजकीय मंचावरही एकत्र दिसले आहेत. मात्र, राज ठाकरे यांच्याकडून युतीच्या घोषणेवर अद्याप शिक्कामोर्तब केले जात नसल्याचे सांगत येत होते. जागा वाटपांचा तिढा सुटल्याशिवाय युतीची घोषणा नाही, असे मनसेच्या नेत्यांनी स्पष्ट केल्याचे सूत्रांनी म्हटले.

युतीची घोषणा झाल्यास आणि जागा वाटपावरुन बिनसल्यास मनसेला त्याचा फटका बसण्याची भीती देखील व्यक्त केली जात होती. त्यामुळेच जागा वाटपाआधीच युतीची घोषणा टाळली जात असल्याचे म्हटले जात होते.

अखेर आता, युतीच्या घोषणेची तारीख आणि वेळ जाहीर झाल्याने जागा वाटपाचा तिढा सुटला असल्याची माहिती समोर आली आहे.

## महापालिकेसाठी आजपासून अर्ज भरण्यास सुरूवात

**मुंबई :** राज्यात २९ महापालिकेसाठी आजपासून अर्ज भरण्यास सुरूवात होणार आहे. ३० डिसेंबरपर्यंत ही प्रक्रिया चालणार असून अर्जांची छाननी ३१ डिसेंबरला होईल. २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. निवडणूक चिन्हांचं वाटप, अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारीला प्रसिद्ध होईल. सर्व २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होईल तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे.

निवडणुकांना अवघे २३ दिवस बाकी आहेत, मात्र अजूनही महायुत्या, महाआघाड्यांची अधिकृत घोषणा झालेली नाही. जागावाटपचाचं त्रांगडं अजूनही कायम आहे. मुंबई महानगरसह राज्यात जवळपास सर्वच ठिकाणी शिंदेंची शिवसेना आणि भाजप एकत्रत लढतील असं चित्र आहे. पुण्यात राष्ट्रवादी विरुद्ध भाजप असा सामना रंगण्याची शक्यता आहे. ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक सहा मनपा असून याठिकाणी भाजप आणि शिंदे सेनेत युतीवरून अजूनही खणाखणी सुरु आहे. ठाकरे बंधूंची युतीची बोलणी अंतिम टप्प्यात आहे.

**निवडणूक कार्यक्रम :** नामनिर्देशन– २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर, नामनिर्देशन पत्राची छाननी– ३१ डिसेंबर, उमेदवार मागे घेणे– २ जानेवारी २०२६ पर्यंत, अंतिम यादी आणि चिन्ह– ३ जानेवारी २०२६, मतदान– १५ जानेवारी २०२६, मतमोजणी/निकाल–१६ जानेवारी २०२६.

## सोनिया गांधी, राहुल गांधी यांना न्यायालयाची नोटीस

**नवी दिल्ली :** नॅशनल हेराल्ड मनी लाँड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना नोटीस बजावली. दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार देणाऱ्या विशेष न्यायालयाच्या आदेशाला ईडीने आव्हान दिले आहे. उच्च न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी १२ मार्च २०२६ रोजी ठेवली आहे.

१६ डिसेंबर रोजी राऊस अव्हेन्यू न्यायालयाने या दोघांविरुद्ध ईडीच्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार दिला होता. राऊस अव्हेन्यू न्यायालयाने म्हटले होते की, ईडीच्या आरोपपत्राची दखल खासगी तक्रारीच्या आधारे घेतली जाऊ शकत नाही.

ईडीने या ट्रायल कोर्टाच्या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडवर त्यांचे कोणतेही नियंत्रण नसल्याच्या गांधी कुटुंबाच्या युक्तिवादाला अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (एएसजी) एसव्ही राजू यांनी विरोध केला.

# देशमुख हत्येप्रकरणी ८ जानेवारीला सुनावणी

**बीड :** बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर एकच खळबळ उडाली. संतोष देशमुखांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. संतोष देशमुखच्या हत्येनंतर राज्यभर जनआक्रोश मोर्चे काढण्यात आली. यादरम्यान बीडमधील मारहाणीचे विविध व्हिडीओ व्हायरल होताना दिसली. बीडमधील परिस्थिती तणावात असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडच्या पालकमंत्रिपदाची सूत्रे आपल्या हातात घेतली. धनंजय मुंडे यांच्यावरही आरोप झाल्यानंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. संतोष देशमुख प्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराडचे नाव आल्याने थेट धनंजय मुंडे यांच्यावरही आरोप करण्यात आली.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज बीडच्या विशेष मकोका न्यायालयात सुनावणी

### वाल्मिक कराडसह सर्व आरोपींना कोर्टाचा थेट दणका

झाली. न्यायालय परिसरातील पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला होता. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम, ॲड. बाळासाहेब कोल्हे उपस्थित यावेळी होते. सर्व आरोपींना हजर करण्यात आले होते. आरोपींचे वकील यावेळी उपस्थित होते. सुनावणीदरम्यान आरोपींवरील ड्राफ्ट कोर्टाने वाचून दाखवला. वाल्मिक कराडसह सर्व आरोपींनी आरोप मान्य नसल्याचे म्हटले. आता या प्रकरणातील पुढील सुनावणी ८ जानेवारीला




होणार आहे.

विशेष सरकारी वकील उज्वल निकम म्हणाले की, आज आरोप निश्चित केले आहेत. खंडणी मिळण्यास अडथळा केला म्हणून संतोष देशमुख यांचा खून केला. पुढील सुनावणी ८ जानेवारी रोजी होईल. आजही आरोपी वकिलांनी या खटल्यात डी फॉर डीले आणि डी फोर डीरेल केले गेले. प्रत्यक्ष पुराव्याचे काम लवकरच सुरू होईल. तीच तीच कारणे न्यायालयात मांडली जात होती. त्यामुळे न्यायालयाने आदेश करावा अशी विनंती केली. खटला लवकरात लवकर चालवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असं उज्वल निकम यांनी सांगितले.

सरपंच संतोष देशमुखांच्या हत्याप्रकरणीच्या सुनावणीत न्यायाधीशांनी न्यायाधीशांनी सर्व आरोपींना असलेल्या गुन्ह्याबाबत माहिती दिली. संपूर्ण घटनाक्रम आरोपीला वाचून दाखवत हे तुम्हाला मान्य आहे का?, असा सवाल विचारला. न्यायाधिशांच्या या प्रश्नावर वाल्मिक कराडसह सर्व आरोपींनी आरोप मान्य नसल्याचे म्हटले. यावेळी वाल्मिक कराड पहिल्यांदाच न्यायालयासमोर स्वत:हून आरोप मान्य नसल्याचं बोलला. तसेच मला बोलायचं आहे, असंही वाल्मिक कराड म्हणाला. आता सदर प्रकरणी ८ जानेवारी रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

# डॉक्टरच निघाला अखेर 'एजंट'

**चंद्रपूर :** एका सावकाराने कर्जाच्या वसुलीसाठी एका शेतकऱ्याला किडनी विकायला भाग पाडल्याची घटना समोर आली होती. या प्रकरणी आता पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. या प्रकरणी आता एका डॉक्टराला सोलापुरातून अटक केली आहे. हा डॉक्टर लोकांना हेरून किडनी विकण्यासाठी कंबोडियाला घेऊन जात होता. या डॉक्टराने आणखी १० ते १२ लोकांची किडनी विकल्याची माहिती आता उजेडात आली आहे.



### कर्जासाठी किडनी विक्री प्रकरणाला धक्कादायक वळण

चंद्रपूर जिल्ह्यात सावकाराच्या जाचाला कंटाळून रोशन कुडे या शेतकऱ्याने आपली किडनी विकल्याचं धक्कादायक प्रकरण समोर आलं होतं. किडनी विकल्याच्या या प्रकरणात आता डॉक्टर कृष्णा उर्फ रामकृष्ण सुंचू (३६) याला सोलापुरातून अटक करण्यात आली आहे. किडनी विक्री प्रकरणात पीडित शेतकरी रोशन कुडे याने फेसबुकच्या माध्यमातून किडनी विकण्यासाठी माहिती मिळवली होती. त्यानंतर चेन्नई येथील डॉक्टर कृष्णा याने त्याला कंबोडिया येथे पाठवून किडनी काढल्याची तक्रार दिली होती.

त्यानुसार पोलिसांनी सायबर सेलच्या मदतीने डॉक्टर कृष्णा याचा शोध घेतला. पोलिसांच्या तपासात डॉक्टर कृष्णा हे त्याचं बनावट नाव असून रामकृष्ण सुंचू हे त्याचं मूळ नाव आहे. रामकृष्ण हा किडनी विक्री प्रकरणात एजंट असल्याची माहिती पुढे आली होती. मुख्य म्हणजे रामकृष्ण सुंचू याला व्यवसायात तोटा आल्याने त्याने कंबोडिया येथे जाऊन स्वतःची किडनी विकली होती.

त्यानंतर कंबोडिया येथील एका डॉक्टरने अशा प्रकारचे किडनी विकणारे लोकं पाठवल्यास १ लाख रुपये कमिशन देण्याचं त्याला आमिष दिलं. डॉक्टरच्या सांगण्यानुसार भारतातल्या अशा गरजू लोकांना हेरून तो किडनी विकण्यासाठी त्यांना कंबोडियाला पाठवायचा. आरोपीच्या तपासात आतापर्यंत त्याने १० ते १२ लोकांना अशा प्रकारे कंबोडिया ला पाठवल्याची माहिती समोर आली आहे. रामकृष्ण सुंचू याच्या अटकेनं आता या प्रकरणातील अवयव तस्करीच्या मोठ्या प्रकरणाचा खुलासा

## ईव्हीएम मशिनवर उमेदवाराचं नाव झाकलं

### ७ कर्मचारी निलंबित, प्रांतलाही नोटीस

**भंडारा :** राज्यातील नगरपालिका निवडणुकांचे निकाल हाती आले असून आता महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यामुळे, नगरपालिका क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी झाला असून आचारसंहिता देखील संपुष्टात आली आहे. मात्र, महापालिका क्षेत्रात काम करणाऱ्या प्रशासनावर आता निवडणुकांची जबाबदारी आली आहे. एकीकडे निवडणुकांचं कामकाज सुरू असताना दुसरीकडे नगरपालिका निवडणुकांवेळी दाखवलेल्या निष्काळजीपणामुळे, बेजबाबदारपणामुळे भंडारा नगरपालिका मतदान केंद्र संदर्भात ७ कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आलं आहे. तसेच, निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

भंडारा नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३ मधील एका मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीनमध्ये उमेदवाराचं नावं नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी भंडारा जिल्हाधिकारी सावन कुमार यांनी मतदान केंद्र प्रमुखासह ७ कर्मचाऱ्यांना काल तडकाफडकी निलंबित केलं. या कारवाईनंतर आता जिल्हाधिकारी सावंत कुमार यांनी या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे प्रमुख असलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा भंडारा प्रांत अधिकारी माधुरी तिखे आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी जुम्मा प्यारेवाले यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

भंडारा नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक तीनसाठी असलेल्या मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीनमध्ये ५ उमेदवार आणि एक नोटा असे ६ पर्याय असणे आवश्यक होते. मात्र, मतदान केंद्र अधिकारी आणि तेथील कर्मचाऱ्यांनी मतदान यंत्र तयार करताना शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार करुणा राऊत यांच्या नावासह नोटा हा पर्याय झाकल्या गेला. त्यामुळे प्रत्यक्षात ईव्हीएम मशीनवर ४ उमेदवारांची नावं असल्यानं त्यांनाच मत मिळाली.

Made with Xodo PDF Reader and Editor

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## होर्डींग्ज लावताना प्राधिकरणाची परवानगी बंधनकारक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. ही निवडणूक संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत.

त्यानुसार निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच त्या निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या ग्रामीण क्षेत्रामध्ये निवडणूक कालावधीत होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, जाहिरात लावताना स्थानिक प्राधिकरणाची परवानगी बंधनकारक राहणार आहे. तसेच परवानगी संपल्यानंतर इमारती, मालमत्ता पूर्ववत करून घेणे, जाहिराती तत्काळ काढून घेणे आवश्यक आहे. तसेच या क्षेत्रात शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपता करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. १६ जानेवारी २०२६ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.




# मनपा निवडणुकीपूर्वीच भाजपमध्ये नाट्यमय घडामोडी..?

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर :** होऊ घातलेल्या लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीपूर्वीच लातूर भाजपमध्ये अचानक नाट्यमय घडामोडी घडल्या असून निवडणूक प्रमुख पदाची डॉ.अर्चना पाटील चाकूरकर यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी अचानक काढण्यात आल्याने तर्कवितर्कांना एकच उधाण आले आहे. चाकूरकरांच्या कौटुंबिक दुःखाचे कारण पुढे करून निवडणूक प्रक्रियेतून डॉ. अर्चना पाटील चाकूरकरांना जाणीवपूर्वक बाजूला करण्याचे षडयंत्र रचले गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. याचे परिणाम मनपा निवडणुकीत निश्चितच पाहायला मिळतील, असाही कयास लावला जात आहे.

नऊ वर्षांपूर्वी पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत लातूरच्या इतिहासात पहिल्यांदा भारतीय जनता पार्टीने मनपावर ताबा मिळवला होता. त्या विजयाचे श्रेय अर्थातच संभाजी पाटील निलंगेकरांना होते. होऊ घातलेल्या मनपा निवडणुकीतही संभाजी पाटील निलंगेकर यांच्यावर प्रभारीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. ही जबाबदारी आता पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे सोपविली गेली आहे. त्यामुळे डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्याकडे यापूर्वी देण्यात आलेली जबाबदारी निलंगेकर यांच्याकडे दिली गेली आहे. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये करण्यात आलेला हा बदल येणाऱ्या काळातील बदलाची नांदी तर नाही ना? असा अंदाजही राजकीय वर्तुळात लावला जात आहे. डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी अल्पावधीत भाजपमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण करण्यात कमालीचे यश मिळवले आहे. याकामी अर्थातच त्यांना त्यांचे दिवंगत श्वशुर, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्याकडून योग्य मार्गदर्शन मिळाले होते, हे कोणालाही सांगण्याची आवश्यकता नाही. शिवराज पाटील चाकूरकर एक कुशल राजकीय नेता होते. स्वपक्षीयच नव्हे तर विरोधकही त्यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व डोळे झाकून मान्य करत असत, असे ते अजातशत्रू व्यक्तिमत्वाचे धनी होते.





आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसशी एकनिष्ठ राहणाऱ्या चाकूरकरांनी आपल्या स्नुषा डॉ. अर्चना पाटील यांना मात्र त्यांच्या इच्छेनुसार कार्य करण्याची अनुमती दिली होती. त्यामुळेच डॉ.अर्चना पाटील भाजपमध्ये कार्यरत झाल्या.

आपल्या राजकीय जीवनातील पहिली वाहीली विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी लातूर शहर विधानसभा मतदार संघात विद्यमान आमदार अमित देशमुख यांना विजयासाठी शेवटच्या क्षणापर्यंत झुंजवले, हे सगळ्यांनी पाहिले आहे. डॉ. अर्चना पाटील यांच्या रूपाने लातूर जिल्हा तसेच प्रदेश भाजपाला एक कणखर चेहरा मिळाला आहे. त्यातच लातूर भाजपच्या काही नेत्यांवर ते काँग्रेसशी हातमिळवणी करतात, असाही आरोप वर्षानुवर्षे केला जात असल्याचे पाहण्यात आले आहे. या गोष्टींपासून डॉ. अर्चना पाटील कोसो दूर आहेत, ही बाबही भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना ज्ञात असल्यानेच मनपा निवडणुकीसाठी त्यांच्यावर निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी सोपविली गेली होती. शिवराज पाटील चाकूरकर यांचे नुकतेच वार्धक्याने देहावसान झाले. त्यामुळे डॉ. अर्चना पाटील चाकूरकर व त्यांचे कुटुंबीय दुःखाच्या छायेत असणार हे खरे आहे. नेमके याच गोष्टीचा लाभ उठविण्यासाठी भाजपमध्ये खलबते शिजली.

मुळात डॉ. अर्चना पाटील या अतिशय कणखर विचाराच्या आहेत. कितीही नाही म्हटले तरी त्यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांचे राष्ट्रीय पातळीवरील राजकारण, कार्य अतिशय जवळून पाहिले आहे. कोणत्या प्रसंगी कशा पद्धतीने वागले पाहिजे, कार्य केले पाहिजे याची त्यांना उत्कृष्ट जाण आहे. त्यातच डॉ. अर्चना पाटील चाकूरकर या लिंगायत समाजातून येतात. लिंगायत समाजात कुटुंबातील कोणतीही व्यक्ती मयत झाल्यास तिसऱ्या दिवशीच्या विधीनंतर त्या कुटुंबातील व्यक्ती आपल्या नियमित व्यवहारासाठी मोकळे होत असतात. त्याप्रमाणे डॉ. अर्चना पाटील त्यांच्यावर पक्षाने सोपविलेली जबाबदारी निश्चितपणे पार पाडण्यास सक्षम होत्या. मात्र, त्यांना या जबाबदारीपासून बाजूला करण्यासाठी त्यांच्या कौटुंबिक दुःखाचे कारण पुढे केले जाणे संयुक्तिक वाटत नाही. लातुरात नुकत्याच पार पडलेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात स्वतः डॉ.अर्चना पाटील यांनी आपण आपले दुःख बाजूला सारून सार्वजनिक, सामाजिक कार्यात पुढे येणार असल्याचे बोलून दाखवले होते. असे बोलून दाखवतानाच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उदाहरण प्रस्तुत केले होते. नरेंद्र मोदींनी आपल्या जन्मदात्या मातेश्रींचे देहावसान झाल्यानंतर सुद्धा दुखवटा पाळण्यापेक्षा आपल्या कार्याला, कर्तव्याला प्राथमिकता देत अंत्यविधीनंतर कॅबिनेटच्या बैठकीला त्यांनी उपस्थिती लावल्याचे उदाहरण प्रस्तुत करून डॉ. अर्चना पाटील यांनीही आपण शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाचे दुःख बाजूला सारून आपल्या कर्तव्याला प्राधान्य देणार असल्याचेच जणू सूचवले होते. त्यांची पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्ण क्षमतेने, सक्षमतेने पार पाडण्याची तयारी असतानाच हा बदल केला गेल्याबद्दल आश्चर्यही व्यक्त केले जात आहे.

मनपा निवडणुकीपूर्वीच भाजपमध्ये घडलेल्या या नाट्यमय घडामोडीमुळे डॉ.अर्चना पाटील यांचे भाजपमधील वाढते प्रस्थ कोणाच्या तरी डोळ्यांत नक्कीच खुपते आहे की काय? असाही अंदाज लावला जात आहे. भाजपाला हा बदल करण्यास भाग पाडणाऱ्यांनी नेमके भाजपचे हित डोळ्यासमोर ठेवले की काँग्रेसचे? की केवळ स्वतःचा राजकीय स्वार्थ पाहिला? असे एक ना अनेक प्रश्न येणाऱ्या काळात उपस्थित होणार आहे. या प्रश्नांची उत्तरे नजीकच्या काळात नक्कीच नागरिकांसमोर येतील, मात्र तोपर्यंत मनपा निवडणूक पार पडलेली असेल.

## विकासासाठी भाजपाच्या पाठीशी उभे राहा : कव्हेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** लातूर शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी रस्ते, पाणी व नाल्यांची सुविधा



करून नागरिकांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम झालेले आहे. निराधारांच्या पगारी, लाडक्या बहिणीच्या खात्यावर दीड हजाराची मदत अशा सुविधा देऊन महिलांना आधार देण्याचे कार्य महायुती सरकारने केलेले आहे. शहराच्या चौफेर विकासासाठी भाजपा व मित्रपक्षाच्या पाठीशी उभे राहाण्याचे काम करावे, असे आवाहन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते नंदनवन कॉलनी येथील व्यंकटराव नागिमे यांच्या निवासस्थानी आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी या बैठकीला सूर्यकांतराव शेळके, माजी नगरसेवक सुभाषअप्पा सुलगुडले, दिलीप पाटील, बाबासाहेब कोरे, बालाजी शेळके, प्राचार्य डॉ.आर.एस.अवस्थी, प्रभाकर कदम, लालासाहेब पाटील, गोविंद सोदले, विठ्ठलराव इर्ले, दिगंबर शेटे, नितीन कोरे, चांडक, लेनेकर, विजय पाटील, औसेकर, मल्लिकार्जून नळगिरे, प्रभूअप्पा खळगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र लातूरकरांसाठी रेल्वे बोगी कारखाना आणून लातूर जिल्ह्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे या विकासाच्या प्रवाहात कायम राहण्यासाठी भाजपा व मित्रपक्षाला साथ देण्याचे काम आपण करावे, असे आवाहनही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नागिमे परिवाराच्यावतीने माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी या बैठकीला नंदनवन कॉलनी येथील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर हे शहरातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सदैव लढा देण्याचे काम करीत आहेत. त्यांनी गेल्या पाच वर्षामध्ये प्रभाग १८ सह शहरातील अनेक प्रभागांचा चेहरामोहरा बदलण्याचे काम केलेले आहे. शहरातील कुठल्याही नागरिकांचा प्रश्न असेल तर ते पोटतिडकीने मांडून तो प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहतात. त्यांनी यापूर्वी भाजपा युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष व आता भाजपा शहर जिल्हाध्यक्ष पदावर कार्य करीत प्रभाग क्र.१८ चा चौफेर विकास करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे अजित भैय्या कव्हेकर यांचे हात बळकट करण्यासाठी व हिंदूत्वासाठी काम करणार्या तरुणाच्या पाठीशी आपण सक्षमपणे उभे राहावे असे आवाहन चांडक यांनी केले.

## पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे.

त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या काळात धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्गमित करण्यात हे आदेश १६ जानेवारी २०२६ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे लागू राहतील.

## २७५ जणांचे ऐच्छिक रक्तदान



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** येथील जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शासकीय रक्त केंद्राच्या मार्फत एकूण २७५ रक्तपिशव्या संकलित करण्यात यश आले.

जिल्ह्यात रक्ताची कमतरता जाणवत असल्याने जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षामार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अविनाश माणिकराव बारगळ, पोलीस निरीक्षक तथा उपप्राचार्य रफिक रज्जाकमियाँ सय्यद, राखीव पोलीस निरीक्षक तथा बाह्यवर्ग प्रमुख शिवाजी माधवराव पाटील यांचे सहकार्य लाभले.

रक्त केंद्रप्रमुख डॉ. शिवराज कंठीकर, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. रणजित चव्हाण व डॉ. मधुरा मुळे यांच्या टीमने तर मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) सिद्धेश्र्वर चौधरी व नितीन पोतदार यांनी संकलनाची जबाबदारी पार पाडली.

## निवडणुकीत ध्वनिक्षेपक वापरावर निर्बंध लागू

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून ही निवडणूक विना अडथळा व शांततेत पार पडण्यासाठी निवडणुकीच्या काळात ध्वनीक्षेपक वापरावर प्रतिबंध घालण्यात आले आहेत. याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी निर्गमित केला आहे.

कोणत्याही वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून त्याचा वापर फक्त सकाळी ६ वाजलेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत संबंधित पोलीस अधिकारी यांची रीतसर परवानगी घेवूनच करता येईल. फिरत्या वाहनावर ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही, विशिष्ट ठिकाणी थांबूनच ध्वनीक्षेपकाचा वापर करावा. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार किंवा इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील, असे जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

## प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर झेंडे लावण्यास प्रतिबंध

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकीची प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पडावी, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार स्थानिक स्वराज्य मतदारसंघ कार्यक्षेत्रासह या निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या ग्रामीण क्षेत्रात वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबीसाठी निर्बंध घालण्यात आले आहेत.

त्यानुसार फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनावर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुनेच लावण्यात यावा. इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही.

फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधीत पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी, निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर लावता येणार नाही.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या या आदेशानुसार निर्गमित केलेले हे आदेश १६ जानेवारी २०२६ रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

## कव्हेकरांच्या हस्ते ब्रम्हकुमारी वर्षा दिदींचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** माऊंट अबू राजस्थान येथील ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या राजयोगिनी ब्रम्हकुमारी उषा दिदी या लातूर दौर्यावर आल्या असताना त्यांच्या दयानंद सभागृहातील व्याख्यानास उपस्थित राहून त्यांचा





संचालिका तथा आंतरराष्ट्रीय पातळीवरील मुख्य प्रवक्त्या शाल व पुष्पगुच्छ देऊन माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण बंकटलाल लाहोटी, संस्थेचे सचिव रमेश गोविंदलाल बियाणी, इंदिराताई लाहोटी, मंगलताई बियाणी, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, ब्रम्हकुमारी सेवा केंद्र लातूरच्या संचालिका राजयोगिणी ब्रम्हकुमारी नंदादिदी, दिव्या दिदी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व राजयोगिणी ब्रम्हाकुमारी उषादिदी यांच्यामध्ये देश आणि राज्यातील आध्यात्मिक विषयावर सविस्तर चर्चा झाली.

यावेळी सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय कार्यालयात सभा घेण्यावर निर्बंध

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिता लागू केली आहे. या निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार स्थानिक स्वराज्य मतदारसंघ कार्यक्षेत्रात निवडणूक कालावधीत शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालये, विश्रामगृहे इत्यादी परिसरात मिरवणुका, घोषणा देणे, सभा घेणे इत्यादीवर निर्बंध घातले आहेत.

## ऑफीसर्स कल्ब जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्यान दिवस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २३ डिसेंबर :** २१ डिसेंबर जागतिक ध्यान दिवसा निमित्त सनराईज योगा स्टुडिओच्या संचालिका नंदिनी पडिले व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मिळून ऑफीसर्स कल्ब जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्यान दिवस साजरा केला. सर्वांनी सूर्योदयापूर्वी एकत्र येऊन सामुहिक सूर्यनमस्कार करत या दिवसाची सुरुवात केली. सनराईज योगा स्टुडिओच्या वत्तीने हा अंतरराष्ट्रीय ध्यान दिवस मागील वर्षापासून साजरा केला जातो.

संयुक्त राष्ट्र महासभेने ६ डिसेंबर २०२४ रोजी सर्वसहमतीने



२१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिवस म्हणून घोषित केला. यावेळी संचालिका नंदिनी पडिले म्हणाल्या अश्रया पध्दतीने सामुहीकपणे हा दिवस आम्ही साजरा करत आहोत.या दिवसाचा उद्देश ध्यानाच्या लाभांबद्दल जागरूकता वाढवणे आणि मानसिक शांति आणि समृद्धीला प्रोत्साहन देणे आहे. सनराईज योगा स्टुडिओच्या सर्व सहकाऱ्यांनी सकाळी पहाटे ६.३० वाजता ऑफिसर्स कल्ब जिल्हाधिकारी कार्यालय येथे एकत्र येऊन जागतिक मेडीटेशन डे ध्यान दिवस साजरा केला.

मानसिक शांति, ध्यानामुळे मानसिक शांति आणि स्थिरता प्राप्त होते. नियमित ध्यानामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य पण सुधारते असे नंदिनी पडिले यांनी याप्रसंगी सांगितले.

## थोडक्यात...

### अजंता व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन




**सोयगाव :** सोयगाव येथील अजंता व्हॅली इंग्लिश स्कूल येथे सोमवारी (दि.२२) विज्ञान प्रदर्शन आणि स्टुडंट्स लेड कॉन्फरन्स घेण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.सुशील जावळे आणि प्रमुख पाहुणे डॉ.रघुनाथ फुसे, समाजसेवक संजय शहापूरकर, संजय पाटील (ग.शि.कार्यालय) सुनील शेटे, भास्कर पिंगाळकरसर, डॉ.दिनकर पिंगश्रळकर, डॉ.स्वाती पिंगश्रळकर,मुख्याध्यापिका मिनाक्षी रोकडे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेच्या संचालिका डॉ.स्वाती पिंगाळकर यांनी केले. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन सोनाली बागुल आणि आभार प्रदर्शन पूजा दामोधर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका प्रियांका रोकडे, सीमा भामरे, सोनाली बागुल, दीक्षा पवार,पूजा दामोधर, रुपाली गोल्हरे, शीतल कटोले, शिक्षक रामचंद्र लाडकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालकांची होती.

### ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर फॅशनमध्ये घडवतोय नवीन क्रांती

**छत्रपती संभाजीनगर :** ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरने या वर्षीच्या पर्वाची सांगता केली, ज्यात फॅशनच्या पारंपरिक संकल्पनांना मोडून काढणारी एक अभूतपूर्व फॅशन कथा सादर करण्यात आली. प्रतिष्ठित हावडा पुलाच्या भव्य पार्श्र्वभूमीवर आणि शहराच्या ऐतिहासिक हुगळी नदीला एका आलीशान रनवेमध्ये रूपांतरित करून, या अंतिम पर्वात डिझायनर अनामिका खन्नाएके । ओके यांचे प्रायोगिक कलेक्शन सादर करण्यात आले. यामध्ये करिश्माई ईशान खट्टर शोस्टॉपर होता, ज्याने डिझाइनला पारंपरिक चौकटींच्या पलीकडे नेले आणि फॅशनला एका नवीन युगात पोहोचवले.

### बजाज पुणे ग्रँड टूर ट्रॉफी' जयपूरमध्ये अनावरण

**पुणे :** भारतात व्यावसायिक सायकलिंगच्या एका नवीन युगाचे प्रतीक असलेल्या, बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ च्या प्रतिष्ठित आणि वारसा-प्रेरित ट्रॉफीचे आज जयपूरमध्ये अनावरण करण्यात आले. राजस्थानच्या उपमुख्यमंत्री श्रीमती दिया कुमारी आणि पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी श्री जितेंद्र दुडी (आयएएस) (रोड रेसचे यजमान शहर) यांच्या उपस्थितीत हा भव्य समारंभ पार पडला. राजस्थानचे खासदार श्री मदन राठोड; राजस्थानचे क्रीडा सचिव डॉ. नीरज के. पवन (आयएएस); सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री ओंकार सिंग; आणि राजस्थान सायकलिंग असोसिएशनच्या निवड समितीच्या अध्यक्षा श्रीमती सारिका चौधरी देखील या प्रसंगी उपस्थित होत्या.

### अधिकृत ल्युब्रिकंट पार्टनर म्हणून उपस्थिती

**नाशिक :** शेल ॲडव्हान्स मोटरसायकल ऑईलने अत्यंत अभिमानाने मोटोव्हर्स २०२५ मध्ये रॉयल एनफिल्डसोबत अधिकृत ल्युब्रिकंट्स पार्टनर म्हणून ठळक उपलस्थिती नोंदवली. भारतातील अत्यंत उत्साही रायडिंग समुदायाला एकत्र आणणारा हा साहस आणि ऊर्जेन भरलेला विकेंड सर्वांसाठीच संस्मरणीय ठरला. मोटोव्हर्स२०२५ मधील शेल ॲडव्हान्सची परिणामकारक उपस्थिती अधोरेखित झाली. उत्साहाने भारलेले परस्परसंवाद, उत्पादनांचा अनुभव आणि परफॉर्मन्सवर आधारित उपक्रमांतून या ब्रँडने मोटरसायकलिंग समुदायासोबत दृढ बंध निर्माण केले.

### पार्क मेडी वर्ल्ड लिमिटेड केपी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, आग्रा, उत्तर प्रदेशचे अधिग्रहण करणार

**मुंबई :** पार्क मेडी वर्ल्ड लिमिटेड उत्तर भारतातील रुग्णालयांची दुसरी सर्वात मोठी साखळी, केपी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ची संपूर्ण विद्यमान भागभांडवल २४५ कोटींच्या संपूर्ण रोख व्यवहारात अधिग्रहित करण्यासाठी एका करारात सामील झाली आहे. हे अधिग्रहण, जे या प्रदेशातील ३६० खाटांची एकूण क्षमता असलेल्या सर्वात मोठ्या आरोग्य सेवा सुविधांपैकी एक आहे, आमच्या क्लस्टर-आधारित विकास धोरणाशी पूर्णपणे जुळते. हे धोरण आमच्या रुग्णालयांना एकमेकांच्या जवळ ठेवून कार्यात्मक कार्यक्षमता वाढवते आणि मोठ्या प्रमाणावरील बचतीचा फायदा मिळवते. शिवाय, हे उत्तर भारतातील प्रमुख शहरी केंद्रांमध्ये आमची उपस्थिती मजबूत करण्याच्या पार्क ग्रुपच्या ध्येयाला लक्षणीयरीत्या बळकट करते. आम्हाला अपेक्षा आहे की एकत्रीकरणानंतर हे केंद्र त्वरित मूल्यवर्धन करेल, आणि येत्या काही वर्षांत क्लिनिकल कार्यक्रम मजबूत करण्यासाठी, कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि उपयोगिता लक्षणीयरीत्या सुधारण्यासाठी केंद्रित प्रयत्न केले जातील.

### वाळूजमध्ये शास्त्रशुद्ध पूजा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामातर्फे वाळूज भागासाठी शास्त्रशुद्ध पूजा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिर व अर्चक-पुरोहित यांना केंद्रस्थानी ठेवून समाजप्रबोधनाच्या हेतूने विविध उपक्रम राबवले जात असून, त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम होणार आहे. यापूर्वी मंदिर आयामाच्या वतीने पंचांग वाचन कार्यशाळा, सामूहिक अथर्वशीर्ष पठण, सामूहिक स्तोत्र पठण स्पर्धा, महिलांसाठी हस्तनिर्मित देववस्त्र स्पर्धा तसेच पुरोहित प्रशिक्षण वर्ग असे विविध कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत. बहुतेक हिंदू घरांमध्ये देवघर असते; मात्र देवघरातील देवांची संख्या, शास्त्रशुद्ध पूजा पद्धत, पंचोपचार-षोडशोपचार पूजा म्हणजे काय, तसेच दैनंदिन पूजेतील सूक्ष्म बाबींची सखोल माहिती सर्वांना असतेच असे नाही. हीच माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही शास्त्रशुद्ध पूजा प्रशिक्षण कार्यशाळा गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता वाळूज येथील बजाजनगर परिसरातील श्री साईबाबा मंदिरात होणार आहे. या कार्यशाळेत वेदमूर्ती वेदाचार्य श्री. रमाकांत देव गुरुजी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करणार असून, उपस्थितांच्या प्रश्नांनाही ते उत्तरे देणार आहेत. कार्यशाळेला प्रमुख अतिथी म्हणून वाळूजमधील प्रसिद्ध उद्योगपती पोपटराव थोरात यांची उपस्थिती लाभणार असून, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या उपयुक्त व मार्गदर्शक शास्त्रशुद्ध पूजा प्रशिक्षण कार्यशाळेला भाविकांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहावे, असे आवाहन वाळूज भाग पालक दामोदरजी घुगे, शहर सहप्रमुख व वाळूज भाग प्रमुख संजीवजी तायडे, वाळूज भाग सहप्रमुख कडूबा रानगोते व कुमार नवले यांनी केले आहे.







# पैठण येथे महामस्तकाभिषेक महोत्सव उत्साहात

**तभा. वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ डिसेंबर :** पैठण येथील श्री शनिग्रह अरिष्ठ निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान अतिशय क्षेत्रात शनि अमावस्येच्या पार्श्वभूमीवर महामस्तकाभिषेक महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले. या धार्मिक उपक्रमाला महाराष्ट्रासह देशातील विविध भागांतून हजारो भाविकांनी उपस्थिती लावत दर्शन व पूजनाचा लाभ घेतला. या कार्यक्रमात आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव ससंघ यांच्या सान्निध्यात भगवान मुनिसुव्रतनाथांचा अभिषेक व विधान विधी यशस्वीरीत्या पार पडला.

कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात खासदार संदिपान भुमरे, आमदार विलास भुमरे, आमदार संग्राम जगताप यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करण्यात आले. पंचामृत अभिषेक, विविध द्रव्यांद्वारे अभिषेक, शांतीमंत्र व

### हजारो भाविकांनी घेतले भगवान मुनिसुव्रतनाथांचे दर्शन

पुष्पवृष्टी अशा विधींचे नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व व्यवस्थापन क्षेत्र समितीने प्रभावीपणे केले.

या प्रसंगी पैठण क्षेत्र व सकल जैन समाजाच्या वतीने आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव यांना क्रांतिकारी राष्ट्रसंत ही मानद पदवी बहाल करून गौरव करण्यात आला. महोत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष महावीर बडजाते, महामंत्री विलास पहाडे, कोषाध्यक्ष विजय पापडीवाल, जयकुमार बाकलीवाल, प्रमोद कासलीवाल, मनोज काला, रायचंद भुस, प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ.संजय गगंवाल, डॉ. राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला, नवयूवक मंडळ महीला मंडळ व विश्वस्त मंडळाने दिली अशी माहिती महामंत्री विलास पहाडे यांनी दिली असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली आहे.







# तीन उमेदवारांनी घेतलेला निर्णय पडला पथ्यावर

**तभा. वृत्तसेवा**

**पैठण, दि. २४ डिसेंबर :** पैठण नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली असून निकालात सर्वत्र शिवसेने पक्षाचा बोलबाला असल्याचे स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे जवळचा पक्ष बाजूला सारत ईतर पक्षाची उमेदवारी घेण्याचा निर्णय तीन उमेदवारांना फायद्याचे ठरले. आता हे उमेदवार निवडणूक जिंकत जनतेचे प्रतिनिधी नगरसेवक म्हणून नप सभागृहात गेले आहेत.

शिवसेनेची पकड असलेल्या पैठणला प्रभाग ४ अ मधून ओबीसी प्रवर्गातून शिवसेनेचे सुनील रासने निवडून आले आहेत. मूळ भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी असलेले रासने हे सर्वाचे परिचयाचे आहेत. त्यांच्या सौभाग्यवती सुवर्णा रासने या भाजपाच्या माजी नगरसेविका आहेत. यंदा रासने यांनी जवळचा पक्ष बाजूला सारत शिवसेना पक्षाकडून उमेदवारी घेण्याचा निर्णय घेतला आणि त्यांचा निर्णय योग्य ठरत ते निवडून आले आहेत.

तसाच प्रकार आपणास प्रभाग क्रमांक १० अ मध्ये पाहावयास मिळाले येथून भारतीय जनता पक्षाशी जवळीक असलेले रमेश उर्फ लालू वीर यांच्या सौभाग्यवती अनिता वीर यांनी शिवसेना पक्षाकडुन निवडणूक लढवण्याचे ठरवले आणि त्यांना ऐनवेळी शिवसेनेने उमेदवारी ही दिली. त्यांनी घेतलेला निर्णय योग्य ठरत पैठण न. प निवडणूकित रेकॉर्ड ब्रेक मते घेऊन विजयी झाल्या आहेत.

तर प्रभाग ११ अ मध्ये अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून शिवसेना पक्षाशी जवळील असलेले स्वप्नील साळवे यांच्या पत्नी मनीषा साळवे यांनी काँग्रेस पक्षाकडुन नगर परिषद निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आणि त्या ही मोठ्या मताधिक्याने निवडून आल्या आहेत. एकंदरीत वरील तिन्ही उमेदवारांनी नगर परिषद निवडणुकीत घेतलेला योग्य निर्णय त्यांच्या पथ्यावर पडला असून ते जनतेचा आवाज बनत नगर परिषद सभागृहात नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत.

# ठाकरेंच्या सेनेला 'जय महाराष्ट्र' करत राजू वैद्य 'भाजपा'त

**तभा. वृत्तसेवा**


**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ डिसेंबर :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला छत्रपती संभाजीनगरमध्ये मोठा संघटनात्मक धक्का बसला असून, उबाठा गटाचे महानगर प्रमुख रेणुकादास उर्फ राजू वैद्य यांनी पक्षाला 'जय महाराष्ट्र' करत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. त्यांच्यासोबत अक्षय खेडकर (विधानसभा संघटक, उबाठा) यांनीही भाजपात प्रवेश केल्याने स्थानिक राजकारणात महत्त्वाची हालचाल घडली आहे.

या प्रवेशानिमित्त राजू वैद्य व अक्षय खेडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी केबिनेट मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार संजय केणेकर, भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे तसेच माजी शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर यांची उपस्थिती होती. सदर प्रवेशामुळे भाजपच्या शहरातील संघटनात्मक बळकटीकरणाला गती मिळाल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. उबाठा गटात दीर्घकाळ संघटनात्मक जबाबदारी सांभाळलेल्या राजू वैद्य



यांच्या पक्षांतरामुळे शिवसेना (उबाठा) गटाच्या शहर पातळीवरील नेतृत्व व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, या घडामोडींवर उबाठा गटाकडून राजू वैद्य परवा पर्यंत आमच्या सोबत होते. अचानक काय झाले माहित नाही.. राजू वैद्य चांगला कार्यकर्ता होता.. पक्षाने अनेक जबाबदारी दिली.त्यांनी हा निर्णय का घेतला हे अनाकलनीय आहे. असल्याचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले.




# सारा खरे हिचा नयनमनोहर भरतनाट्यम अरंगेत्रम सोहळा उत्साहात संपन्न

**तभा. वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ डिसेंबर :** देवमुद्रा-अ मुव्हमेंट स्कूलची विद्यार्थिनी सारा खरे हिचा भरतनाट्यम नृत्यप्रकारातील औपचारिक रंगमंच प्रवेश दर्शविणारा अरंगेत्रम सोहळा रविवारी तापडिया रंगमंदिर येथे यशस्वीरीत्या पार पडला. शास्त्रीय नृत्य परंपरेतील महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या अरंगेत्रमद्वारे साराने आपल्या नृत्यसाधनेचा सुस्पष्ट आणि परिपक्व आविष्कार सादर केला.

नटराज, गुरू आणि रसिकांना वंदन करून सादरीकरणाची सुरुवात करत तिने मार्गम अंतर्गत गणेश स्तुतीपर पुष्पांजली, अलारिपू, शब्दम्, वर्णम् तसेच काली स्तुती अशा विविध नृत्यरचनांचे सादरीकरण केले. प्रत्येक सादरीकरणात लयबद्धता, भावाभिनय आणि अंगशुद्धीचा प्रभावी समन्वय दिसून आला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खासदार डॉ. भागवत कराड तसेच डॉ. सौ. संध्या दुधगावकर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सादरीकरणाचे कौतुक करत साराच्या उज्ज्वल कलात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या सादरीकरणासाठी तिच्या गुरू डॉ. सौ. सौम्यश्री यांनी नटुवंगमवर साथ दिली. किर्तनाकृष्णन व बकुल पाटील यांनी गायन, के. दक्षिणमुर्ती यांनी मृदंग, मंगला वैद्यनाथन यांनी व्हायोलिन तर कुमार कृष्णन यांनी बासरीवर साथ दिली.

# दुर्मिळ आजारावर मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया

**तभा. वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ डिसेंबर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील राहता येथील आदित्य साबळे या १५ वर्षीय मुलावर मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्यंत किचकट आणि जोखमीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आली असून, या वैद्यकीय हस्तक्षेपामुळे त्याला नव्या आयुष्याची संधी मिळाली आहे. जन्मताच आदित्यच्या कमरेतील पाच मणक्यांपैकी दोन आणि छातीतील बारा मणक्यांपैकी एक असे तीन मणके एकमेकांना चिकटलेले होते. सुरुवातीच्या काही वर्षांत व्यंगत्व सौम्य स्वरूपात दिसत होते; मात्र अकराव्या वर्षानंतर पाठीच्या कण्यातील




नस हळूहळू कमजोर होऊ लागली.

यामुळे पायातील ताकद कमी होणे, चालताना वारंवार पडणे, आधार घेऊन चालावे लागणे तसेच पाठीवर स्पष्ट बाक दिसणे अशी लक्षणे वाढत गेली. भीती आणि अनिश्चिततेमुळे कुटुंबीयांनी काही काळ उपचार पुढे ढकलले. अखेर

### १५ वर्षीय आदित्य साबळेला नवे आयुष्य

परिस्थिती गंभीर झाल्यानंतर मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये तपासणी करण्यात आली.

मेडिकव्हर हॉस्पिटलचे वरिष्ठ शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. विवेक देशमुख यांनी सांगितले की, पाठीला आलेला बाक सरळ करणे आणि कमजोर झालेली नस सुरक्षित ठेवणे ही दोन मोठी वैद्यकीय आव्हाने आमच्यासमोर होती. हजारातून एक ते दोन मुलामध्ये असा आजार आढळतो आणि आमच्या हातावर होणाऱ्या हजारो शस्त्रक्रियांपैकी ही एक अतिशय दुर्मिळ व गुंतागुंतीची शस्त्रक्रिया होती. विशेष म्हणजे शस्त्रक्रियेनंतर अवघ्या २४ तासांत मुलगा रिकव्हर झाल्याने आम्हालाही आश्चर्य वाटले.

**तात्काळ उपचार घ्यावेत-डॉ. कुटे**

दहा ते पंधरा वयोगटातील मुलांमध्ये कधी ऐकण्यात किंवा पाहण्यात न आलेले आजार उद्भवू शकतात. अशा आजारांमुळे शाळेत जाणारे मूल मानसिकदृष्ट्या खचून जाते. आमच्या डॉक्टरांनी जोखमीची आणि अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करून हे सिद्ध केले आहे की, मेडिकव्हर हॉस्पिटलसाठी ही बाब अभिमानास्पद आहे. भीती आणि संभाव्य खर्चामुळे पालक वेळेत उपचारासाठी पुढे येत नाहीत; मात्र उशीर झाल्यास उपचार अधिक क्लिष्ट होतात. त्यामुळे पालकांनी योग्य वयातच मुलांचे निदान करून तात्काळ उपचार घ्यावेत, असे आवाहन मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी केले आहे.

# रशीद मामू यांच्या प्रवेशाने उबाठा गटात वाद; खैरे यांचा भर रस्त्यात उघड विरोध

**तभा. वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ डिसेंबर :** उबाठा गटात रशीद मामू यांच्या पक्षप्रवेशानंतर संघटनात्मक पातळीवर अस्वस्थता निर्माण



झाली असून, या निर्णयावरून अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी थेट भर रस्त्यात रशीद मामू यांना विरोध करत तीव्र नाराजी व्यक्त केली. या घटनेमुळे पक्षातील समन्वय, निर्णयप्रक्रिया आणि स्थानिक नेतृत्वाशी संवाद या मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

खैरे यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले की, पक्षात कोणताही नवीन प्रवेश करताना स्थानिक नेते व कार्यकर्त्यांना विश्र्वासात घेणे आवश्यक आहे. तसे न करता थेट प्रवेश देणे ही संघटनात्मक शिस्तीची पायमल्ली असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांच्या या भूमिकेमुळे उबाठा गटातील अंतर्गत मतभेद अधिक ठळक झाले असून, आगामी राजकीय रणनीतीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, या प्रकरणावर सत्ताधारी गटातील नेत्यांनीही प्रतिक्रिया देत खोचक टीका केली आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी उबाठा गटावर उपहासात्मक टोला लगावत, या प्रवेशामुळे पक्षाची ओळख आणि दिशा गोंधळात पडत असल्याचे सूचित केले. एकूणच या घडामोडींमुळे उबाठा गटासमोर डॅमेज कंट्रोल, अंतर्गत संवाद व्यवस्थापन आणि नेतृत्व समन्वयाचे आव्हान उभे राहिले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३३०/२०२५**

१. मालताबाई पदमसिंग रेकनोद, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. पळसखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. २. दिपक पदमसिंग रेकनोद, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. मंगल पदमसिंग रेकनोद, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध : निल

प्रकरण : **वारसाहक्क (सक्सेशन) प्रमाणपत्र मिळणे बाबत**

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल र. सुरळकर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत पदमसिंग रामसिंग रेकनोद यांचा दिनांक १०/१०/२०२४ रोजी पळसखेडा येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत पदमसिंग रामसिंग रेकनोद यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दिनांक २३/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ०५/०२/२०२६.

**विभीगीय लिपीक**
**आदेशावरुन,**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर.सोयगाव**
**प्रतिलीपी :-**
**१. नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव,**
**२. ग्रामपंचायत पळसखेडा, सोयगांव जि. औरंगाबाद,**

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३२६/२०२५.**

अर्जदार :-१. कल्पना भिमराव देसाई, वय. ६० वर्षे, धंदा, मजुरी, २. विजय भिमराव देसाई, वय. ४२ वर्षे, धंदा. मजुरी, दोघेही रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ३.अजय भिमराव देसाई, वय. ४५ वर्षे, धंदा, नौकरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. फलॅट नं. ०११, सिध्दीविनायक सोसायटी, तुलसिविहार, आसनगांव ईस्ट, शहापुर, जि. ठाणे.

-विरुध्द-

गैरअर्जदार- कोणीही नाही.

प्रकरण-**वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.**

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय.आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत भिमराव विठठलराव देसाई हे दि. २२/०३/२०१८ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा प्रुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत भिमराव विठठलराव देसाई यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल.

पुढील तारीख :- ३१/०१/२०२६.

आज दि. २३/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

**आदेशानुसार**
**विभागीय लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, सोयगाव**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर., सोयगाव**

Made with Xodo PDF Reader and Editor



## अग्रलेख...

# पराभवाच्या परंपरेचे पाईक!

प्रत्येक राजकीय पक्षाच्या कार्यशैलीचे काही नेमके वैशिष्ट्य, वेगळेपण असते. काही राजकीय पक्ष देशाच्या, समाजाच्या शाश्वत हिताकरिता सातत्याने प्रयत्न करीत असतात, तर काही ज्या नेत्यांच्या जिवावर अस्तित्व जपतात, त्यांच्या गोतावळ्यापुरता विचार करीत असतात. अशा पक्षांनी नेमके कोणाच्या हिताचे राजकारण केले, त्यातून स्वतः काय कमावले आणि जनतेस काय दिले याचा लेखाजोखा मांडताना, हे दोन फरक स्पष्टपणे समोर येतात. महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेने आपल्या सहा दशकांच्या राजकारणातून नेमके काय कमावले, काय गमावले आणि जनतेस नेमके काय दिले याचा लेखाजोखा कधीतरी त्रयस्थपणे मांडला जायला हवा. आपले सर्व पूर्वग्रह, सहानुभूती किंवा मतभेद बाजूला ठेवून या पक्षाच्या वाटचालीकडे पाहिल्यास, सहा दशकांच्या राजकारणात हा पक्ष वाटचालीच्या काही पावलांवर पुरता फसत गेल्याचे दिसते. या पक्षाच्या स्थापना काळात बाळासाहेबांच्या सोबत असलेल्या नेत्यांच्या पहिल्या फळीतील महत्त्वाचे नेते मानल्या जाणाऱ्या मनोहर जोशी यांनी एका संशोधन प्रबंधातून हा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्यामागे संशोधकाचा त्रयस्थपणा नव्हता. म्हणूनच, शिवसेनेच्या भविष्यकाळाविषयीचे भाकीत करताना त्यांनीही समाजातील काही मान्यवरांच्या मतांचा आधार घेतला. जोपर्यंत बाळासाहेबांची पुण्याई शिवसेनेच्या पाठीशी आहे आणि बाळासाहेबांचे कर्तृत्व पाहिलेली पिढी आहे, तोवर शिवसेनेचे राजकारण प्रभावी राहील आणि पुढे ही पुण्याई कमी होत जाईल, असे परखड भाकीत त्याच पुस्तकात एका ज्येष्ठ व अनुभवी राजकीय निरीक्षकाने नोंदविले आहे. आज उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या गेल्या काही वर्षांच्या वाटचालीकडे मागे वळून पाहताना हे भाकीत खरे ठरत असल्याचे दिसून येते. नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद-पंचायतींच्या निवडणुकांतील निकालांनी बाळासाहेबांचा वारसा सांगणाऱ्या उद्धव ठाकरे यांना त्यांच्या नेतृत्वाची आणि महराष्ट्राच्या राजकारणातील त्यांच्या पक्षाची जागा दाखवून दिली आहे. योग्य राजकीय निर्णय घेऊन व भूतकाळातील असंख्य चुकांचे ओझे उतरवून वेळीच दुरुस्ती केली नाही तर बाळासाहेबांचा राजकीय वारस म्हणून अभिमान मिरविण्याजोगे त्यांच्या गाठीशी काही उरलेले नसेल हे स्पष्ट दिसू लागले आहे.

निवडणुकीतील विजयाचे श्रेय घेण्यासाठी अनेक जण पुढे येत असतात. पराजयाला मात्र कोणीच धनी नसतो. रविवारी लागलेल्या निकालांनंतर महाविकास आघाडीच्या आभासी झेंड्याखाली आभासी पद्धतीनेच एकत्र आलेल्या पक्षांच्या पराभवाचा धनीदेखील असाच अदृश्य झाला आहे. एका बाजूला, भारतीय जनता पार्टीच्या राजकीय वाटचालीतील सर्वांत मोठा विजय म्हणून राज्यातील नगर परिषद निवडणुकांच्या निकालाची ऐतिहासिक नोंद होत असताना, महाविकास आघाडी नावाच्या गाजराच्या पुंगीचा ऐतिहासिक किंवा न भूतो असा पराभव महाराष्ट्रात घडला. भाजपा व भाजपासोबत असलेल्या पक्षांची महायुती आणि काँग्रेस, शरद पवारांचा राष्ट्रवादी गट व उद्धव ठाकरेंचा गट यांचा समावेश असलेली महाविकास आघाडी यांच्या निवडणुकीतील कामगिरीची तुलना केल्यास, हा फरक स्पष्ट होतो. प्रत्येक निवडणुकीतील प्रत्येक विजयानंतर पुढच्या निवडणुकीत त्याहूनही अधिक देदीप्यमान विजय मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेने सतत निवडणूकमग्न असलेली भाजपा आणि प्रत्येक निवडणुकीतील प्रत्येक पराजयानंतर पुढच्या निवडणुकीत त्याहूनही अधिक दारुण पराभव पत्करणारी महाविकास आघाडी असा हा फरक या निवडणुकांतही कायमच राहिलेला दिसला. ही वाटचाल अशीच सुरू राहिली, तर उद्धव ठाकरेंचा गट व केवळ कागदावर एकत्र असलेल्या महाविकास आघाडीचे राजकीय भवितव्य काय असेल हे वेगळे सांगण्यासाठी कोणत्याही 'भाकीत-भोंदू'चीदेखील गरज राहणार नाही. कोणत्याही निवडणुकीतील विजयानंतर नव्या उत्साहाने पुढच्या निवडणुकीसाठी कामाला लागणे, नवी मोर्चेबांधणी करणे आणि विजय मिळालेल्या निवडणुकीतही नजरेस आलेल्या त्रुटी दूर करून त्या दुरुस्त करणारी भाजपाची रणनीती आहे. दुसरीकडे, प्रत्येक पराजयानंतरही त्याचे आत्मपरीक्षण किंवा चिंतन करून विश्लेषणदेखील न करता केवळ आत्ममग्नतेतून अन्य नेत्यांस फडतूस वगैरे समजण्याचे बेमुर्वत राजकारण ही ठाकरे नीती आहे. प्रत्येक निवडणुकीत आपल्याला मतदार सातत्याने नाकारत आहेत, झिडकारत आहेत आणि केवळ द्वेष व सूडभावनेतून ज्यांना फडतूस म्हणून हिणविले त्या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली विजयी वाटचाल करणाऱ्या भाजपप्रणीत महायुतीला स्पष्ट कौल मिळत आहे हे दिसत असूनही ते वास्तव ठाकरे गटाने स्वीकारले नाही. उलट, अस्तित्वातच नसलेली व पुराव्यानिशी दाखवून देता येणार नाहीत अशी कारणे देत पराजयाचे खापर प्रतिस्पर्ध्यावर फोडण्याची राजनीती केली. याआधीच्या अनेक निवडणुकांत धडे मिळूनही त्या वास्तवाकडे साफ दुर्लक्ष करून आत्ममग्न राहणाऱ्या ठाकरेंच्या राजकारणास जनता प्रतिसाद देत नाही, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. हातवारे करून, हवेत बाहू उंचावून आणि टोमणे, कोट्या मारून निवडणुकीच्या राजकारणाचे गांभीर्य घालवत हास्यजत्रा फुलविणाऱ्या प्रचारसभांचा प्रभाव आता मतदारांवर पडत नाही, हेही स्पष्ट झाले आहे. आपल्या राजकारणाला केवळ प्रतिस्पर्धी पक्षाच्या विद्वेषाची झालर लावणे पुरेसे नाही. प्रतिस्पर्धी पक्षांच्या नेत्यांना लाखोली वाहून किंवा त्यांच्या शारीरिक उणिवांवर बोटे ठेवून बाष्कळ विनोदाचे फवारे उडवून राजकारणात आपली रेघ प्रतिस्पर्ध्याहून मोठी करण्यात यश येईल अशा भ्रमात राहणे म्हणजे जनतेला मूर्ख समजण्यासारखेच असते. प्रत्येक पराजयानंतर किमान आपल्याला जनतेने का नाकारले असावे याचे चिंतन करण्याची मानसिकता तरी दाखविणे गरजेचे असते. महाविकास आघाडी नावाने एकत्र असलेल्या काँग्रेसमध्ये तशी परंपरा तरी आहे. सारे खापर कोणा श्रेष्ठींच्याच माथी मारले जाणार असल्याच्या जाणिवेने त्या उघड करणे सोयीचे नसल्याने काँग्रेसचे नेते आतल्या आत कुढत तरी असतात. उद्धव ठाकरे यांच्या पक्षास पराभवाची वास्तविक मीमांसा करणे किंवा खऱ्या कारणांचा शोध घेण्याचेच वावडे असल्याने, नवा पराभव हा अगोदरच्या पराभवाहूनही दारुण कसा असतो याचे उत्तरही कधीच सापडणार नाही अशीच स्थिती दिसते.


राज्याच्या सामाजिक समस्यांचा ठोस अभ्यास, राज्याच्या विकासाची नीती, अर्थकारणाचे पैलू किंवा जनतेच्या हिताचे नेमके मुद्दे अशा बाबींवर ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने मतदारांसमोर काही भक्कम भूमिका मांडल्याचे अभावानेच आढळते. केवळ मनोरंजन करून मतदारांचा कौल मिळविता येईल हा विश्वास मात्र ठाकरे यांच्या प्रत्येक भाषणात आढळतो. बाळासाहेबांनीही काहीशी अशीच मनोरंजन नीती आपल्या भाषणात वापरली होती. पण तेव्हा त्यांनी राष्ट्रीय प्रश्नांवर काही ठोस भूमिकाही घेतलेल्या आढळतात. उद्धव ठाकरे यांनी अशा प्रश्नांवर घेतलेल्या भूमिका अत्यंत उथळ, अभ्यासहीन आणि जाणिवेचा अभाव स्पष्ट दर्शविणाऱ्या असल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या विकासाच्या मुद्यावर त्यांनी घेतलेल्या भूमिकांवरही व्यक्तिगत हट्टाग्रहीपणाचाच प्रभाव होता, हे त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीतील स्थगिती धोरणातूनही स्पष्ट झाले होते. त्यांच्या या धोरणामुळे विकासाची गती उलट्या दिशेने गेली हा आरोप खोडून काढण्याचा व आपल्या नीतीचे समर्थन करणारी ठोस भूमिका मतदारांसमोर मांडून ती पटवून देण्याचा प्रयत्नही त्यांनी कधीच केलेला दिसत नाही. माणसे जोडणे आणि बेरजेचे राजकारण करणे ही खरी गरजही त्यांनी स्वीकारली नाही. उलट, 'गेले ते कावळे' अशी संभावना करून फाजील आत्मविश्वास जपत निष्ठावंतांचीही संभावना करण्याच्या वजाबाकीच्या राजकारणामुळे पक्षाला लागलेली गळतीही त्यांनी गांभीर्याने घेतली नाही. पराजयाची प्रामाणिक मीमांसा करण्याचे उद्धव ठाकरे यांनी मनावर घेतले असते, तर या बाबी त्यांनाही केव्हाच ध्यानी आल्या असत्या. आता ती वेळ गेली आहे. मग पराजयाच्या परंपरेची पालखी मिरविणाऱ्यांचे वेगळे भविष्य काय असणार?

---

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# म्यानमारमधील गृहयुद्ध



भारत, चीन आणि आग्नेय आशियाच्या त्रिकोणीय जंक्शनवर म्यानमार वसला आहे. तो आग्नेय आशियाचे प्रवेशद्वार आहे. जागतिक महासत्तांच्या स्पर्धेत म्यानमार हे एक नवीन रणांगण बनले आहे. भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जपान यांच्या 'क्वाड'मुळे चीनला या गटाची भीती वाटते. चीनची खरी ताकद त्याच्या दुर्मिळ पृथ्वी संसाधनामध्ये आहे. चीनने 'रेअर अर्थ मॅग्नेट्स'च्या जोरावर तर अमेरिकेची कोंडी केली होती. पाकिस्तान आणि म्यानमारमध्ये जगातील काही दुर्मिळ पृथ्वी संसाधने आहेत आणि म्यानमारच्या उत्तर सीमेवर डिस्प्रोसियमसह जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सर्वांत मोठे दुर्मिळ पृथ्वीसाठे आहेत. हे खनिज अचूक-मार्गदर्शित शस्त्रे, इलेक्ट्रिक वाहने आणि प्रगत इलेक्ट्रॉनिक्ससाठी महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच त्यावर नियंत्रण ठेवणारा दीर्घकाळ जागतिक वर्चस्व राखेल. कारण त्यामुळे त्यांना प्रगत शस्त्रे विकसित करता येतील आणि त्यांचे तंत्रज्ञान वाढवता येईल. २०२१ च्या लष्करी उठावानंतर चीनने म्यानमारमध्ये मजबूत पाय रोवले आहेत. चीनने म्यानमारच्या लष्कराला सातत्याने शस्त्रे पुरवली आहेत. पाश्चात्त्य निर्बंधांमुळे म्यानमारच्या लष्कराला चीनवर अवलंबून राहण्यास भाग पाडले आहे. चीनने त्याचा अचूक फायदा घेतला आहे. चीनने म्यानमारच्या ८० टक्क्यांहून अधिक आवश्यक खनिज निर्यातीवर नियंत्रण मिळवले आहे आणि प्रक्रिया न केलेली खनिजे देशांतर्गत युनिट्सकडे हस्तांतरित केली आहेत. तथापि, आता परिस्थिती वेगाने बदलत आहे. 'काचिन इंडिपेंडन्स आर्मी' (केआयए)सह अनेक वांशिक बंडखोर गटांनी लष्कराविरुद्ध पाऊल उचलले आहे. त्यामुळे चीनला दुर्मिळ खनिजे काढणे कठीण झाले आहे.

'केआयए' ने चीनला रोखण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आता अमेरिकेला म्यानमारमध्ये प्रवेश मिळू लागला आहे. ट्रम्प प्रशासनाने म्यानमारच्या लष्कराशी संपर्क वाढवला असून लष्कराला विविध सवलती दिल्या आहेत. शिवाय, उत्तर थायलंडमधील चियांग माई वाणिज्य दूतावासाद्वारे अमेरिकन गुप्तचर संस्था म्यानमारमध्ये अधिक सक्रिय झाल्या आहेत. अमेरिकेसाठी मार्ग कठीण असला, तरी चीनच्या वर्चस्वाला किमान त्रास होऊ लागला आहे. भारत म्यानमारमध्ये एक शक्तिशाली खेळाडू बनला आहे. भारताच्या मदतीशिवाय अमेरिकेला म्यानमारमध्ये पाय रोवणे कठीण आहे. दुसरीकडे, भारताने दुर्मिळ खनिजे काढण्यासाठी तंत्रज्ञान प्रगत केले आहे. याचे केंद्रबिंदू 'राष्ट्रीय क्रिटिकल मिनरल मिशन' आहे. त्यात परदेशी खाणींचे अधिग्रहण, प्रगत प्रक्रिया क्षेत्रांची निर्मिती आणि संशोधन आणि विकासक्षमतांचा समावेश आहे. भारताची 'मिनरल्स फॉरेन लिमिटेड' (काबील) आधीच अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलियामध्ये खनिजांचा शोध घेत आहे. भारताने म्यानमारच्या काचिन राज्यात संभाव्य सहकार्याबाबत 'जीएसआय' आणि म्यानमार मंत्रालयांशी सखोल चर्चा सुरू केली आहे. 'क्वाड' भागीदार ऑस्ट्रेलिया आणि जपानदेखील ईशान्य भारताला पर्यायी प्रक्रिया केंद्र म्हणून काम करण्यासाठी आग्रह धरत आहेत. म्यानमारचा शेजारी असल्याने भारताला महत्त्वपूर्ण फायदे मिळतील आणि म्यानमार पुढील काही वर्षे भू-राजकीय रणांगण बनून राहील. म्यानमार सध्या गृहयुद्धाशी झुंजत आहे. या देशातील राखीन राज्यातील एका रुग्णालयावर अलिकडेच हवाई हल्ला झाला. त्यात ३० लोक ठार झाले आणि सुमारे ७० जण जखमी झाले. असे मानले जाते, की 'अराकान आर्मी' या बंडखोर गटाचे सैनिक रुग्णालयात उपचार घेत होते किंवा लपून बसले होते. म्यानमार सैन्य आणि सरकारने अद्याप हवाई हल्ल्याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. एक फेब्रुवारी २०२१ रोजी म्यानमार सैन्याने (तत्मादॉ) लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार उलथवून टाकले. २०२० च्या निवडणुकीत आंग सान सू की यांच्या 'नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी' (एनएलडी) ने प्रचंड मतांनी विजय मिळवला होता; परंतु लष्कराने हेराफेरीचा आरोप करत सत्ता काबीज केली. यामुळे देशभरात व्यापक निदर्शने झाली. ती लष्कराने हिंसकपणे दडपली. विरोधकांनी राष्ट्रीय एकता सरकार (एनयूजी)ची सशस्त्र शाखा असलेली 'पीपल्स डिफेन्स फोर्स' (पीडीएफ) स्थापन केली. डझनभर वांशिक सशस्त्र गट देखील लष्कराविरुद्ध लढत आहेत. हे गट दशकांपासून स्वराज्याची मागणी करत आहेत. बंडखोरांनी म्यानमारचा अर्धा भाग ताब्यात घेतला.

ऑक्टोबर २०२५ मध्ये लष्कराने 'ताआंग नॅशनल लिबरेशन आर्मी' (टीएनएलए)कडून क्युक्मे शहर परत मिळवले. लष्कर अजूनही यांगोन आणि नायपिदासारख्या प्रमुख शहरांवर नियंत्रण ठेवून आहे. या काळात चीनने लष्कराला लष्करी मदत आणि त्याच्या पाईपलाईन आणि दुर्मिळ माती खाण प्रकल्पांचे संरक्षण करण्यासाठी दबाव आणला. यामुळे बंडखोरांना मोठा धक्का बसला. लष्कराने नागरिकांना लक्ष्य केले. सप्टेंबरमध्ये राखीन राज्यातील एका शाळेवर हल्ला करण्यात आला. त्यात २२ विद्यार्थी ठार झाले. युनिसेफने हल्ल्याचा निषेध केला. ऑक्टोबरमध्ये चाऊंग-यू टाऊनशिपमध्ये बौद्ध उत्सवावर झालेल्या हल्ल्यात ३२-४० जणांचा मृत्यू झाला. यामध्ये मुलांचाही समावेश होता. काया राज्यात बंडखोर आणि लष्करामध्ये मोठी लढाई सुरू आहे. रुग्णालये आणि गावांवरही हल्ला झाला आहे, २३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या हल्ल्यात ८० नागरिकांचा मृत्यू झाला. म्यानमारमध्ये जगातील दुर्मिळ पृथ्वी संपत्ती आहे. त्यासाठी जगभरातील प्रमुख शक्ती म्यानमारच्या गृहयुद्धात आग भडकवत आहेत.

२०२१ मध्ये सैन्य सोडून गेलेले कॅप्टन कौंग थू विन यांनी सांगितले की, म्यानमारच्या लष्कराने नागरिकांची निर्घृण हत्या केली. खाजगी मालमत्ता जप्त करून मानवी हक्कांचे उल्लंघन केले. दरम्यान, लष्कराचे मनोबल खूपच खालावले आहे. त्याला सैन्य आणि शस्त्रांचे नुकसान सहन करावे लागत असून जनरलदेखील बंडखोरांना शरण गेले आहेत. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये एका पावसाळी रात्री, वुन्ना क्याव आणि त्यांचे काही सहकारी सैनिक म्यानमारमधील लष्करी तळ सोडून गेले. काही तासांनंतर, त्यांना एका तीव्र संघर्षग्रस्त क्षेत्रात तैनात करण्यात येणार होते, तिथे सैन्य लोकशाही समर्थक सशस्त्र गटांचे हल्ले रोखण्यासाठी संघर्ष करत होते. मात्र वरिष्ठ अधिकारी आणि कमांडर झोपलेले असताना हे सैनिक गुपचूप करिनमधील कंपाऊंडमधून निघून गेले. या कृत्यापायी किमान सात वर्षे तुरुंगवास आणि कदाचित मृत्युदंडाची शिक्षा होऊ शकते.

फेब्रुवारी २०२१ मध्ये एका बंडाद्वारे सत्ता काबीज केल्यापासून म्यानमारच्या लष्कराला त्यांच्या राजवटीचा विरोध दाबण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे. यामध्ये लष्कराच्या हिंसाचार आणि दडपशाहीविरुद्ध लढण्यासाठी शस्त्रे हाती घेणारे लोकशाही समर्थक गट आणि स्वातंत्र्यासाठी दीर्घकाळ लढणारे वांशिक अल्पसंख्यकांचे सशस्त्र गट यांचा समावेश आहे. ते लष्करी राजवटीविरुद्धच्या संघर्षात सामील झाले आहेत. २७ ऑक्टोबर रोजी वांशिक अल्पसंख्यक सशस्त्र गटांच्या युतीने (थ्री ब्रदरहुड अलायन्स) नवीन सत्तापालट विरोधी लढवय्यांसह उत्तर शान राज्यात एक मोठे आक्रमण सुरू केले, तेव्हा दबाव आणखी वाढला. आधीच अनेक आघाड्यांवर संघर्ष करत असलेले सैन्य अचानक झालेल्या हल्ल्यामुळे सावध झाले. 'ऑपरेशन १०२७' असे नाव देण्यात आलेले हे आक्रमण चीनच्या सीमेवर जलद प्रगती करत इतर भागात हल्ले करण्यास प्रेरित करत होते. प्रतिकार गटांची प्रगती सर्वत्र मिश्रित आहे. म्यानमारचे सैन्य मोठ्या पराभवाच्या उंबरठ्यावर आहे, अशी सुरुवातीची अपेक्षा अकाली होती; परंतु ऑक्टोबरपासून उत्तरेत विमान पाडले गेले. शस्त्रे जप्त केली गेली. महत्त्वाची शहरे आणि पुरवठा मार्ग गमावले. हे सैन्यासाठी अपमानास्पद ठरले. त्यामुळे त्याच्या नेतृत्वाविरुद्ध अंतर्गत रोष निर्माण झाला आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

**विजय कुळकर्णी**

# लोणार सरोवराचा वाढता जलस्तर

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथील जगविख्यात खाऱ्या पाण्याच्या सरोवरातील जलस्तर सध्या वाढत आहे. त्यामुळे सरोवरातील पुरातन हेमाडपंथी मंदिर व जीवसृष्टीला धोका निर्माण झाला आहे. यामुळे पर्यावरणवाद्यांची चिंता वाढली आहे.

हजारो वर्षांपूर्वी उल्कापातामुळे हे सरोवर निर्माण झाले आहे. बेसाल्ट खडकामध्ये असलेल्या व खाऱ्या पाण्याचे म्हणून हे सरोवर जगातील अभ्यासकांचे आकर्षण आहे. देश-विदेशातील वैज्ञानिक व अभ्यासक लोणार येथे या सरोवराचा अभ्यास करण्यासाठी येतात. दरवर्षी मोठ्या संख्येत पर्यटक देखील भेट देतात. विशेष म्हणजे खाऱ्या पाण्याचे हे एकमेव सरोवर आहे. त्याच्या परिसरात १२ प्राचीन हेमाडपंथी मंदिरे आहेत. कमळजा देवीचे मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. गेल्या काही वर्षांपासून या सरोवरातील जलस्तर वाढत आहे. पाण्याची पातळी वाढल्याने कमळजा देवीचे मंदिर जवळपास १५ फूट पाण्यात बुडाले आहे. सरोवरातील वाढती पाण्याची पातळी हा पर्यावरणवादी, अभ्यासक आणि नागरिकांचा चिंतेचा विषय ठरत आहे. कारण, यापूर्वी सरोवरातील पाण्याची पातळी कधीच वाढत नव्हती. मंदिर यापूर्वी कधीच पाण्यात बुडाले नव्हते, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

पाण्याची पातळी वाढण्याचे नेमके कारण आजपर्यंत स्पष्ट झालेले नाही. याविषयी लोणार येथील सुधाकर बुगदाणी व खामगाव येथील सुप्रसिद्ध छायाचित्रकार अशोक खेकाळे यांनी सरोवराच्या जलस्तर वाढीबाबत शासन व पुरातत्त्व विभागाकडे अनेक निवेदन दिली होती. त्याचा सातत्याने पाठपुरावा केला होता. सरोवराच्या वर पाझर तलाव व जलसंवर्धनाची कामे झाल्याने सरोवरातील झरे जिवंत होऊन जलस्तर वाढत असल्याचे निरीक्षण या दोघांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. मात्र, त्याकडे लक्ष देण्यास शासनाला कधी वेळ मिळाला नाही. अशोक खेकाळे यांची मुलगी ॲड. कीर्ती निपाणकर यांच्या मार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. मात्र, सुधाकर बुगदाणी आणि अशोक खेकाळे यांचे निधन झाल्याने हा संघर्ष अर्ध्यावरच थांबला. आता पुन्हा सरोवरातील जलस्तरात वाढ झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे पर्यावरणवादी व नागरिक चिंताग्रस्त झाले आहेत आणि त्यांनी हा धोका टाळण्यासाठी तातडीने जलस्तर वाढीचे कारण शोधून त्यावर नियंत्रण मिळविण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, नागपूरचे अधीक्षक अरुण मलिक यांनी एका वृत्तसंस्थेला सांगितले की, जलस्तर वाढण्याचा शोध घेतला असता त्यात असे दिसले की, सरोवराच्या आजूबाजूला संरक्षित वनक्षेत्राचा झालेला विकास व वृक्षारोपण वाढल्यामुळे सूक्ष्म पर्यावरणात बदल झाला आहे. त्यामुळे परिसरात जलसंधारण क्षमतेत वाढ झालेली असावी. त्यांनी असेही सांगितले की, पुरातत्त्व विभाग कमळजा देवी मंदिराच्या चोहोबाजूने संरक्षक भिंत व चबुतरा उभारण्याची योजना तयार करीत आहे. त्यामुळे जलस्तर वाढला तरीही सर्व मंदिरे सुरक्षित राहतील व भाविकांना मंदिरात जाता येईल. जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी सांगितले की, सरोवरातील पाणी बाहेर काढण्यासाठी किंवा वाहून जाण्याचा कोणताही मार्ग नाही आणि नैसर्गिक झऱ्यांतून पाण्याचा ओघ सुरू असल्यामुळे सातत्याने सरोवरातील जलस्तर वाढत आहे. तसेच, काही वर्षांपासून लोणार व परिसरात पर्जन्यमानात मोठा बदल झाला आहे. यावर्षी या परिसरात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली.

आयआयटी, मुंबईच्या तज्ज्ञांनी नमुने घेतले असून जलस्तर वाढण्याच्या कारणांचा ते शोध घेत आहेत. हा नैसर्गिक बदल का होत आहे ? याचा पर्यावरणावर काय प्रभाव पडेल? यावर त्यांचे संशोधन सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे. असे असले तरी, लोणार सरोवराचे रक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. सरोवरातील या नैसर्गिक बदलात कोणताही मानवीय हस्तक्षेप नाही. मग हा बदल का व कसा होत आहे? याचे उत्तर शोधून त्यावर उपाय करणे हे संशोधक व वैज्ञानिकांसमोरील मोठे आव्हान आहे. या जागतिक व नैसर्गिक वारशाचे संरक्षण झाले पाहिजे, अशी पर्यावरणप्रेमी व लोणारवासीयांची अपेक्षा आहे.

८८०६००६१४९

---

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# इंडिगोचे संकट : कोण किती बळकट?

डिसेंबर महिन्याच्या प्रारंभीच भारतीय हवाई वाहतूक क्षेत्रात अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या इंडिगो एअरलाईन्सने आपल्या मनमानीने व उद्दामपणे प्रवाशांना ज्या बेमुर्वतखोरपणे सरकारी प्रयत्न-पुढाकाराला भीक न घालता धारेवर धरले, त्या व्यवस्थापकीय मनमानी वा उद्दामपणाला काय म्हणावे? विमान वाहतूक क्षेत्रात यापूर्वी विमान वाहतूक कर्मचाऱ्यांपासून वैमानिकांच्या संपापर्यंतचे कित्येक प्रयत्न पाहण्यात आले. मात्र, इंडिगोने अचानक, अघोषितपणे; मात्र एकप्रकारे नियोजनबद्ध पद्धतीने केलेला व्यवस्थापन प्रेरित 'बंद' हासुद्धा कदाचित, व्यवस्थापकीय संप पद्धतीचा आगळावेगळा आक्रस्ताळा प्रकारच म्हणावा लागेल.

अशाप्रकारे इंडिगो एअरलाईन्सद्वारा देशभरातील हजारो उड्डाणे रद्द करून अक्षरशः लाखो प्रवाशांना कुठलीही पूर्वसूचना न देता, विमान वाहतूक रद्दच नव्हे; तर बंद करण्याचा सपाटा लावला. शेवटी त्याची दखल सरकारने घेणे अपरिहार्य व आवश्यक ठरले. यातूनच इंडिगोने प्रवाशांपासून प्रशासनापर्यंत सर्वांच्याच आशा-अपेक्षांना कसे मातीमोल करण्याचे व्यावसायिक धारिष्ट्य केले, हे आता पुरतेपणी व सर्वांपुढे आले आहे. त्यातूनच या हवाई वाहतूक कंपनी व्यवस्थापनाचा दुराग्रही मनमानीपणा स्पष्ट झाला आहे.

ग्राहकांसह आम जनतेचा आक्रोश व इंडिगोच्या उद्दामपणाची गांभीर्याने नोंद घेत, केंद्र सरकारने याप्रकरणी हस्तक्षेप करणे अपरिहार्यच होते. सरकारने काहीशा उशिराने लक्ष घातल्यानंतर देशांतर्गत सर्वांत मोठ्या अशा हवाई वाहतूक करणाऱ्या इंडिगोशी संबंधित विविध संदर्भात जे मुद्दे प्रामुख्याने पुढे आले ते पुढीलप्रमाणे :

हवाई वाहतुकीला अधिक सक्षमतेसह सुरक्षेची जोड देण्यासाठी व विशेषतः याचवर्षी अहमदाबाद विमानतळावर घडलेल्या भीषण अपघातानंतर केंद्रीय हवाई वाहतूक मंत्रालयाने काही नवे दिशानिर्देश जारी केले होते. यामध्ये विमानचालकांचे कामकाज व कामाचे तास नव्याने स्पष्ट करण्यात आले होते. हे नवे निर्देश १ नोव्हेंबर २०२५ पासून लागू करण्यात आले होते व त्यासंबंधी मंत्रालयाने सर्वच हवाई वाहतूक कंपन्यांना पूर्वसूचित केले होते. असे असूनही इंडिगोने या नव्या नियमांमुळे विमानचालकांची संख्या व त्यापोटी त्यांचे वेतन वाढेल, या तद्दन बाजारू विचाराने या नव्या नियमांची अंमलबजावणी केलीच नाही.



असे होण्याचे या प्रकरणातून दिसून आलेले महत्त्वाचे कारण म्हणजे, हवाई वाहतूक मंत्रालयाने जारी केलेले नवे नियम हे न्यायालयाच्या २०२४ मध्ये दिलेल्या निर्देशांवर आधारित आहेत. मात्र, या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी हवाई वाहतूक मंत्रालयाने दिलेली ढील व वाढीव कालमर्यादा, हवाई वाहतुकीची वाढती गरज, इंडिगोची या क्षेत्रात ८० टक्के व्यवसायासह असणारी व्यावसायिक दादागिरी-प्रशासनिक मनमानी या साऱ्यांच्या परिणामी या मुद्यांची गांभीर्याने अंमलबजावणी झालीच नाही.

या संदर्भातील नव्याने केलेल्या पडताळणीत स्पष्ट झालेली बाब म्हणजे, जागतिक पातळीवर हवाई वाहतूक व्यवसायाचा अभ्यास करता; विमानतळ प्रशासन, प्रत्यक्ष हवाई वाहतूक व ग्राहकसेवेसह एकूणच हवाई वाहतूक क्षेत्रातील खर्चाचा व खर्चाच्या प्रमाणात भारतीय हवाई वाहतूक जागतिकस्तरावर सर्वाधिक खर्चीक ठरली असून, त्याचा बोजा भारतीय ग्राहक आधीच सोसत आहेत.

हवाई वाहतूक व्यवसाय-व्यवस्थापनातील मूलभूत तत्त्व म्हणजे, त्यामध्ये समाविष्ट असणारा महत्त्वाचा व मूलभूत घटक म्हणजे प्रवासी व वैमानिकांमधील परस्पर विश्वास. यातूनच सुरक्षित, गतिमान व आरामदायी प्रवासासाठीचे खात्रीशीर वाहन-साधन म्हणून प्रवासी जनता विमान वाहतुकीचा विचार करते व त्यासाठी प्रसंगी खर्चीक पर्यायपण स्वीकारते.

असे असताना एखादी विमान वाहतूक कंपनी नैसर्गिक आपत्ती वा नियंत्रणाबाहेरच्या वाहतूक परिस्थितीमुळे नव्हे, तर अंतर्गत व्यवस्थापकीय म्हणजेच ऑपरेशनल कारणाने अचानक व पूर्वसूचना न देता; आपली सेवा अनिश्चित स्वरूपात स्थगितच नव्हे, तर खंडित करते, अशा वेळी ही व्यवस्थापकीय मनमानी सर्वच दृष्टीने असहनीय होते. या क्षेत्राचे व्यावसायिक स्वरूप पाहता, इंडिगोची भूमिका म्हणूनच अक्षम्य ठरते.

प्रशासकीयसंदर्भात व सकृद्दर्शनी जरी इंडिगो आपल्या निर्णयाचे खापर हवाई वाहतूक मंत्रालयाचे निर्देश व या निर्देशांचे पालन करताना उत्पन्न झालेली आव्हानात्मक स्थिती यावर फोडत आहे. असे करताना प्रशासकीय निर्देशांचे पालन करण्याची जी प्रशासकीय व व्यवसाय-व्यवस्थापनासाठी अत्यावश्यक अशी म्हणजेच गव्हर्नन्सविषयक महत्त्वपूर्ण मुद्याला सोयीस्करपणे ज्या पद्धतीने बगल देण्यात आली, ती बाब अधिकच चीड आणणारी ठरते.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कुठल्याही हवाई वाहतूक कंपनीकडून असा प्रकार घडल्यास त्यावर संबंधित सरकार वा प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर दंड, दंडात्मक कारवाई, कायदेशीर खटले, व्यवसाय निलंबन अशा स्वरूपाची मोठी व थेट कारवाई खात्रीने व तातडीने केली जाते. या संदर्भात सरकारीस्तरावर त्वरित व तातडीची कारवाई महत्त्वाची ठरते. मात्र, वेगवान म्हणून खर्चीक असूनही, लाखो प्रवाशांनी पसंत केलेली देशातील प्रमुख हवाई वाहतूक कंपनी देशांतर्गत बहुसंख्य प्रवाशांना आपली सेवा अचानकपणे व कुठलीही पूर्वसूचना न देता, ज्या पद्धतीने वंचितच नव्हे, तर टांगतीवर ठेवते. अशा प्रकारे खऱ्या अर्थाने अत्यंत महत्त्वाच्या, संवेदनशील व सेवाप्रवण सेवा क्षेत्रात सुरू झालेल्या मनमानीला वेसण घालणे तर दूर, त्यावर प्राथमिक स्वरूपातील कारवाईची सुरुवात करण्यासाठी सरकारने चार दिवस वाट पाहिली. दरम्यान, मोठे नुकसान सर्वांचेच झाले, त्याचे काय? त्यादृष्टीने प्रसंगी देशांतर्गतच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील हवाई वाहतूक सुचारू व सुरळीतपणेच नव्हे, तर सातत्याने व संवेदनशील स्वरूपात सुरू राखण्यासाठी सर्वच अटी व शर्ती नव्याने लिहाव्या लागतील, प्रसंगी शोधाव्यासुद्धा लागतील. इंडिगो प्रकरणाचा हाच मोठा व महत्त्वाचा बोध ठरतो.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

---

### पराभवाचे 'तुणतुणे'

महाराष्ट्रात २१ डिसेंबरला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे निकाल भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या बाजूने लागले, हे अपेक्षितच होते. असेच निकाल मागच्या वर्षी महाराष्ट्र विधानसभेचे सुद्धा होते व निकालाचा कल सुद्धा असाच होता. त्या निकालांवर विरोधकांनी उशिरा का होईना, 'मतचोरी' झाली म्हणून रान उठवले होते. आपल्या स्वार्थी राजकारणाचे दुष्परिणाम दुसऱ्यावर ढकलणे, हे विरोधकांचे नेहमीचेच झाले आहे. काल आलेले स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे निकाल, ही जनतेने विरोधकांना दिलेले जबरदस्त प्रत्युत्तर आहे. तरीही काही विरोधी नेत्यांनी कुरबुर सुरू केली आहे. झालेल्या चुकांपासुन योग्य तो धडा शिकणे, हे राहुल गांधींसारख्या नेत्यांच्या गावीही नाही. असे नेते स्वतःच्या वक्तव्याने नामुष्की ओढवून घेतात व दोष मात्र भाजपाला देतात. पण यामुळे भाजपाची पत वाढते, हे यांच्या लक्षात येत नसेल काय, की जनतेला हे मूर्ख समजतात?

आजकाल जनता बरीच सज्ञान आहे. कार्यक्षम व जनतेची कामे करणाऱ्या पक्षाला ते निवडतात. म्हणून विरोधी पक्षांनी जबाबदारीने रचनात्मक विरोध करावा व आपली जनतेत विश्वासार्हता वाढवावी, हेच त्यांच्या हिताचे आहे.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### माकप आघाडीसह काँग्रेसला धक्का

देशात सर्वाधिक साक्षर नागरिक असलेल्या केरळ राज्याच्या तिरुवनंतपुरम या राजधानीच्या शहराच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत तब्बल साडेचार दशकांची सत्ता असलेल्या कम्युनिस्टांचे या शहरावर असलेले वर्चस्व लोकशाही मार्गाने भारतीय जनता पक्षाने मोडीत काढले आणि १०१ पैकी ५० जागांवर विजय मिळवत सत्ता काबीज केली. या निकालाने सत्तारूढ माकपच्या नेतृत्वातील डाव्या लोकशाही आघाडीसह येथील काँग्रेसचे विद्यमान खासदार शशी थरुर आणि काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीलाही जबरदस्त धक्का बसला आणि म्हणून हा निकाल भाजप कार्यकर्त्यांसाठी अतिशय उत्साहवर्धक म्हणावा लागेल.

येत्या वर्षभरात केव्हातरी केरळ विधानसभेच्या निवडणुका होतील त्या धर्तीवर भाजपासाठी या विजयाचे महत्त्व मोठे आहे. ते नजरेआड करता येणार नाही.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### शाळकरी मुलांच्या वाहतूक सुरक्षिततेचा प्रश्न

सर्वसाधारणपणे आजही अनेक ठिकाणी नर्सरीपासूनची मुले शाळा, क्लास व ट्युशनसाठी ऑटोरिक्षातून प्रवास करताना दिसतात. मात्र या ऑटोरिक्षांची सुरक्षितता चिंताजनक आहे. अनेक रिक्षांना नीट दरवाजे, सुरक्षित कड्या किंवा आवश्यक संरक्षक व्यवस्था नसते. त्याशिवाय क्षमतेपेक्षा अधिक मुले रिक्षात बसलेली असतात. बरेचदा चार-पाच वर्षांची लहान मुले थकव्यामुळे रिक्षात बसून डुलकी देत असतात, तर काही मुले आपल्याच धुंदीत खेळत-मस्ती करत करतात. रिक्षावाले कुठे कट मारून जातात तर कुठे मुलांनी भरलेली रिक्षा सिग्नल तोडून नेतात. हे सगळं बघून काळजात धस्स होत. शाळकरी मुलांच्या वाहतुकीसाठी ऑटोरिक्षांबाबत स्पष्ट व कडक नियम आहेत का, याबाबत प्रश्न निर्माण होतो. प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. सुरक्षिततेचे ठोस नियम अंमलात आणावेत व नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

---

## आजचे संघगीत-८१

मंगळवार, २३ डिसेंबर २०२५

### भक्तिपूर्ण हे अवघे जीवन मातृभूमिच्या पदकमलाशी

भक्तिपूर्ण हे अवघे जीवन मातृभूमिच्या पदकमलाशी
तेवत तेवत मधुभावाने एकरूप हो परमात्म्याशी ॥धृ॥

राष्ट्रसमर्पित जीवन जगणे
सद्धर्माचे तेज फुलविणे
या ध्येयास्तव अविरत श्रमणे
जीवनपूजा ही अविनाशी ॥१॥

जागृत होता समष्टि शंकर
दानवतेला मिळे न अवसर
मंगलतेने गाता सुस्वर
मीलन होइल चित् तत्त्वाशी ॥२॥

साधना ही जीवनाची
देवत्वाला जागविण्याची
क्षणिकांतुनि त्या चिंतनाची
वाट पुसावी भगवंताशी ॥३॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# ईटोली गावच्या विकासासाठी सरपंच यांनी पालकमंत्री साकोरे यांच्याकडे केली मागणी

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील डोंगराळ भागात असलेली ईटोली हे गाव विकासापासून वंचित राहिले आहे ईटोली गावाला जिंतूर वरून घेवडा ते ईटोली भोगाव ते ईटोली येलदरी ते ईटोली दाभा पाटी ते ईटोली चारही बाजूने रस्ते अत्यंत खराब झाले आहेत आमच्या गावासाठी परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री यांनी गावच्या विकासासाठी अनेक योजनांची कामे देण्यात आलेले आहेत त्यामध्ये सांस्कृतिक सभागृह सिमेंट रस्ते इत्यादी कामे पालकमंत्री झाल्यापासून त्यांनी ईटोली गावच्या विकासासाठी कुठल्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ दिली नाही व निधी सुद्धा कमी पडू दिला नाही त्यामुळे ईटोली गावचा विकास बऱ्याच पैकी झाला आहे अजून काही विकास होणे बाकी राहिलेले आहे गावाला या गावावर आजूबाजूचे कमीत कमी दहा ते बारा गावांचा संपर्क आहे यामुळे या गावाला चारही बाजूने रस्ते चाळणी झालेली असून या रस्त्याच्या कामासाठी पालकमंत्र्यांनी त्वरित निधी उपलब्ध करून या चारही रस्त्याच्या कामाला गती देण्यात यावी व लवकरात लवकर मान्य करून हा रस्ता चांगल्या प्रकारे करावा अशी मागणी ईटोली गावच्या सरपंच सो संगीता ताई जगदीश राव घुगे पाटील यांनी परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा कार्यसम्राट राज्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे व गावच्या विकासासाठी कुठल्याही प्रकारचा निधी कमी पडू देऊ नका अशी मागणी त्यांनी केली आहे यावेळी त्यांच्यासोबत जगदीश राव घुगे भाजप तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थिटे यांनी परभणी येथील निवासस्थानी जाऊन भेट घेतली त्यावेळी त्यांनी या मागण्या पालकमंत्र्याकडे केले आहेत.



## संक्षिप्त वृत्त...

### धसाडीत ३ कोटी ४० लाख रुपये खर्चाच्या अंतर्गत रस्त्यांच्या माजी आ. सुरेश वरपुडकर यांच्याहस्ते उद्घाटन

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी तालुक्यातील धसाडी या पुनर्वसित गावासाठी ३ कोटी ४० लाख रुपयांच्या निधीतून होणाऱ्या अंतर्गत रस्ते विकासकामांचे उद्घाटन आज सोमवार २२ डिसेंबर रोजी माजी आमदार सुरेशराव वरपुडकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक सौ. प्रेरणा समशेर वरपुडकर, भाजपा तालुकाध्यक्ष दत्तरावजी साबळे, सभापती शिवाजीराव बेले पाटील, पं.स. सदस्य मधुकरराव लाड, सरपंच सुधाकरराव शिंदे, चेअरमन अनुराग शिंदे, उपसरपंच बाबासाहेब शिंदे, ग्रामपंचायती सदस्य छत्रपती शिंदे, बालासाहेब शिंदे, अशोक शेरकर, नर्सिंग शिंदे, रामेश्वर शिंदे, संभाजी शिंदे, भाऊसाहेब शिंदे, मुरलीधरराव शिंदे, लिंबाजी पाटील, सखारामजी शिंदे, माणिकराव शिंदे, रामभाऊ शिंदे, अंगलगावचे सरपंच ज्ञानोबा माऊली शिंदे, माळसोन्ना सरपंच शिवाजीराव शेळके, सरपंच मुक्तार भाई शेख व नागरिक उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यात वरपुडकर यांनी सांगितले की, धसाडी व परिसरातील सर्व गावांसाठी नेहमीच विकास निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहिला असून, भविष्यातही विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

दरम्यान, धसाडी गाव पुनर्वसित असल्यामुळे गावातील अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब होती आणि नागरिकांना दैनंदिन वाहतुकीत तसेच इतर व्यवहारांमध्ये अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येवर उपाय म्हणून वरपुडकर यांनी सातत्याने पाठपुरावा करून शासनाकडून निधी मंजूर करून घेतला. या कामांमुळे गावातील अंतर्गत रस्ते सुस्थितीत येणार असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### मराठवाडा स्कूलमध्ये राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा

**परभणी,/प्रतिनिधी :** नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा स्कूलच्या सेमी इंग्रजी विभागात थोर गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती राष्ट्रीय गणित दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेमी इंग्रजी विभागाचे पर्यवेक्षक पाटील हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून सहपर्यवेक्षक तसेच गणित विषय विभाग प्रमुख सुनील रामपूरकर उपस्थित होते. एक वर्ग - एक कार्यक्रम या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता नववी 'ई' च्या वर्गाने केले असून, वर्गशिक्षिका सौ. दिपाली जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून परभणी ॲस्ट्रॉनॉमी सोसायटीचे सदस्य व गणित विषय तज्ज्ञ प्रसाद वाघमारे सर उपस्थित होते. त्यांनी विविध गणितीय ट्रिक्सच्या माध्यमातून अवघड वाटणारा गणित विषय विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने समजावून सांगितला.

यावेळी श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनकार्याची माहिती सांगणारे भित्तीपत्रक इयत्ता नववीतील विद्यार्थी विवेक नागरे व प्रथमेश घुगे यांनी तयार केले होते. त्यांना वर्गशिक्षिका सौ. दिपाली जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. गणित दिनाच्या निमित्ताने रुद्र क्षीरसागर व विवेक नागरे यांनी रामानुजन यांच्या कार्यावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एक वर्ग - एक कार्यक्रम उपक्रमांतर्गत इयत्ता नववी 'ई' च्या विद्यार्थ्यांनी सादर केले. सूत्रसंचालन कार्तिक रेनगडे व उत्तम मांडे यांनी केले, तर आभार अतुल भाबट यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी संस्था सल्लागार श्रीपाद कुलकर्णी, अभिजीत कुलकर्णी, गोपाळ रोडे, तसेच गणित विषय शिक्षक गणेश सूर्यवंशी, अविनाश जाधव, अविनाश कंधारकर, नितीन बिरादार, वसंत पुरी आदींनी परिश्रम घेतले.

### महापालिका निवडणूक प्रक्रियेबाबत अधिकाऱ्यांची बैठक

**परभणी,/प्रतिनिधी :** महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १०, ११ व १३ चे निवडणूक निर्णय अधिकारी रतिनसिंह साळोक यांनी आज २२ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता बी. रघुनाथ सभागृह येथे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच त्यांच्या कक्षातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेतली.

या बैठकीत त्यांनी निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती देत, निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने करावयाच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन केले. या वेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यु. व्ही. पौळ, के. एन. देशमुख, डॉ. शिवाजी मगर, उपअभियंता सुधिर तेहरा तसेच पथकात नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत निवडणूक कामकाज पारदर्शक, वेळेत व नियमांनुसार पार पाडण्यावर भर देण्यात आला.

### महाराज यशवंत होळकर यांच्या राज्याभिषेक सोहळा निमित्त विषेश प्रतिनिधी प्रा. तुकाराम साठे यांची निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** श्रीमंत छत्रपती महाराज यशवंतराव होळकर (प्रथम) यांच्या राज्याभिषेक सोहळा उत्साहानिमित्त विशेष प्रतिनिधी म्हणून परभणीतील प्रा.तुकाराम साठे यांची निवड करण्यात आली आहे. वाफेगाव (या.खेड, जिल्हा पुणे) पुणे येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी ६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता किल्ले वाफेगाव येथे श्रीमंत छत्रपती महाराज यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक दिन सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त देवसडी व सावळी येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त डॉक्टर देवराव कराळे सोनोग्राफी सेंटर जिंतूर यांच्या वतीने व आडगाव सर्कलचे भावी जिल्हा परिषद सदस्य तालुक्यातील आडगाव सर्कल मधील सावळी बुद्रुक व देवसडी कैवामनराव बोर्डीकर माध्यमिक विद्यालय सावळी बुद्रुक या ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त डॉक्टर देवराव कराळे सोनोग्राफी सेंटर जिंतूर यांच्यामार्फत जिल्हा परिषद शाळा सावळी व देवसडी या ठिकाणी शालेय साहित्य वाटप करण्यात आले या कार्यक्रमानिमित्त सरपंच भारत घुगे उपसरपंच योगानंद नागरी ग्रामपंचायत सदस्य प्रल्हाद घुगे दिनकरराव घुगे बालाजी घुगे नारायण घुगे मारुती घुगे योगेश घुगे जत्रा घुगे अशोक घुगे बाळू घुगे अमोल भिसे सुरेश घुगे गोपाल विंदे पंढरीनाथ शिंदे गजानन घुगे काशिनाथ हिवरकर आशुतोष घुगे दोन्ही शाळेतील मुख्याध्यापक मुंडे सर व महाले सर तसेच या दोन्ही शाळेतील संपूर्ण शिक्षक पुरंदर व गावकरी मंडळी सावळी बुद्रुक हे यावेळी उपस्थित होते तसेच तालुक्यातील देवसडी येथे प्राथमिक शाळेत शालेय साहित्य वाटप करण्यात आली.



यावेळी देवसडी येथील सरपंच शिवाजीराव काळे माजी सरपंच ओंकार कुटे तसेच सावळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रॉस्परस पब्लिक स्कूल येथे राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात



**सेलू,/प्रतिनिधी:** श्रीराम प्रतिष्ठान अंतर्गत प्रॉस्परस पब्लिक स्कूल येथे आज, २२ डिसेंबर रोजी, महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती राष्ट्रीय गणित दिवस म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. मुख्याध्यापिका क्षीरसागर यांनी रामानुजन यांच्या जीवनातील संघर्ष आणि त्यांनी गणितामध्ये केलेल्या अमूल्य योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांनी सांगितले की, रामानुजन यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही गणितातील अनेक क्लिष्ट समस्या सोडविल्या, जे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

त्यानंतर, रामानुजन: एक गणितीय जादूगार या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धा, गणितीय कोडी सोडवणे आणि प्रात्यक्षिके यांसारखे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी यात मोठ्या उत्साहाने भाग घेतला. गणित शिक्षक राजेंद्र जाधव व योगिता कदम यांनी गणिताचे दैनंदिन जीवनातील महत्त्व समजावून सांगितले, तर काही विद्यार्थ्यांनी रामानुजन यांच्या कार्यावर आधारित भाषणे दिली.कार्यक्रमाच्या शेवटी, मुख्याध्यापिका प्रगती क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना गणिताचा अभ्यास आवडीने करण्याची प्रेरणा दिली आणि या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व विद्यार्थी यांचे आभार मानले. या दिवसाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.

यावेळेस श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे तसे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.प्रगती क्षीरसागर व इतर शिक्षक वृंद उपस्थित होते.

## श्रीमंत महाराज यशवंतराव होळकर राज्यभिषेक दिनी उपस्थित राहण्याचे आवाहन- गजानन वऱ्हाड



**जिंतूर,/प्रतिनिधी-** छत्रपती शिवरायांनंतर स्वराज्यरक्षक म्हणून ज्यांनी ६ जानेवारी १८०६ रोजी स्वतः चा विधीवत राज्याभिषेक करून ते महाराजा झाले. श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) यांच्या दैदिप्यमान इतिहासाचे स्मरण करण्यासाठी दर वर्षी ६ जानेवारी रोजी त्यांचे जन्मस्थान असलेल्या किल्लेवाफगाव राज्याभिषेकदिन''सोहळा पार पडतो.

या सोहळ्यानिमित्त माझी परभणी जिल्हा प्रतिनिधी म्हणून निवड केल्याबद्दल मी होळकर राज घराण्याचे वंशज श्रीमंत भूषणसिंह राजे आणि महोत्सव समितीचे मनापासून आभार मानतो. अखंड भारताचे स्वप्न पाहणाऱ्या आणि अजेय योद्ध्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराजांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याची ही संधी दिल्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी सर्व शिव-शंभू प्रेमी आणि होळकर भक्तांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन होळकर राज घराण्याचे वंशज श्रीमंत भुषणसिंह राजे होळकर यांनी केले आहे.

## चारचाकी वाहनांसाठी क्रमांकाची नवीन मालिका

### पसंती क्रमाकासाठी नवीन वाहन खरेदीधारकांना आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, परभणी यांच्या मार्फत चारचाकी वाहनांसाठी २२ ही नवीन मालिका (सिरीज) सुरु करण्यात येत आहे. तरी इच्छुक नवीन वाहन खरेदी करणाऱ्या वाहनधारकांनी विहीत नमुन्यात विहीत पसंती क्रमांकाच्या शुल्काचा डिमांड ड्राफ्ट उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी यांच्या नावे अंतिम दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० पर्यंत सहा. रोखपाल खिडकी क्र ११ वर जमा करावा.

नवीन वाहन नोंदणी ही वितरकांच्या स्तरावर होत असल्यामुळे लिलाव दिनांकात व सिरीज सुरु करण्याच्या दिनांकात बदल करण्याचे पुर्ण अधिकार सदर कार्यालयाकडे आहेत.

एका पसंती क्रमांकासाठी दोन किंवा अधिक अर्ज प्राप्त झाल्यासच त्या क्रमांकाचा लिलाव करण्यात येईल, याबाबत वेगळा आदेश अथवा सुचना काढण्यात येणार नसुन केवळ अर्जदारास समक्ष उपस्थित राहण्याबाबत अर्जावर नमुद मोबाईल क्रमांकावर कळविण्यात येईल. याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी व जास्तीत जास्त नवीन वाहन खरेदी करणाऱ्या वाहनधारकांनी पसंती क्रमांकासाठी अर्ज करावेत, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी कळविले आहे.

## जिंतूर शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा मोठा सुळसुळाट : तीन चिमुकल्या बालकंवर जीवघेणा हल्ला चढवला

**जिंतुर/प्रतिनिधी-** येथील हिदायत नगर परिसरात दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५:३० वा दरम्यान तीन लहान मुले त्याचा घरा समोर खेळत असताना अचानक मोकाट कुत्र्यांनी त्या तीन ही बालकांनावर हल्ला करून गंभीर जख्मी केल्याची घटना घडली आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी की, हितायतनगर वसाहत मधील शे रिजवान शे हुसेन( वय ६ वर्ष ), सय्यद तैमूर सय्यद फेरोज( वय ५ वर्ष), व जुनेरा तोफीक कुरेशी( वय१ वर्ष) हे तीन चिमुकले बाळ त्याचा घरासमोर खेळत होते. त्या वेळी





या परिसरातील मोकाट भटक्या कुत्र्यांनी अचानक या बालकांवर हल्ला चढविला या हल्यात शे रिजान याचा डोक्याला चावा घेतल्याने तो गंभीर जख्मी झाला असुन इतर दोन लहान बालंकाना सुद्धा दुखापत झाली आहे.या बालकांचा आक्रोश ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊनमोठ्या प्रयत्नाने या बालकांची कुत्र्यांच्या तावडीतून सुटका केली.जखमी तिन्ही बालकांना जिंतूरच्या ग्रामीण रुग्णालयात प्रथम उपचार करून त्यांना परभणीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेनंतर हिदायत नगर सह सर्व शहरामध्ये भितेचे वातावरण निर्माण झाले आहे या मोकाट भटक्या कुत्र्यांच्या हल्यामुळे लहान बालकांच्या सुरक्षेतेबद्दल पुन्हा एकदा प्रश्न निर्माण झाला आहे जिंतूर शहरातील नागरिकांची नगरपरिषदेस अशी मागणी आहे की या मोकाट कुत्र्यांचा ताबडतोब बंदोबस्त करण्यात यावा व मोकाट कुत्र्यांचा निर्बिजीकरन, नसबंदी करून त्यांची संख्या कमी करावी.

## सावरगाव (खु) येथील गट क्रं १३५ मधील शेतकऱ्यांना वाहतुकीसाठी तात्काळ रस्ता खुला करुन देण्याची मागणी

### शेतकऱ्यांची तहसील प्रशासनाकडे मागणी; अन्यथा अमरण उपोषण करण्याचा शेतकऱ्यांनी दिला इशारा

**महेश दिशागत**

**मानवत ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील मौ. सावरगाव खु. येथील गट क्रं १३३ व १३४ च्या नंबर धुऱ्यावरुन रस्ता मिळण्यासाठी वरिष्ठ कार्यालयात प्रकरण दाखल केले आहे.

प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांनी २७ फेब्रुवारी २०२५ आदेश रद्द करुन नव्याने रस्ता देण्यासाठी आदेशीत केलेले आहे. परंतु अद्याप ही रस्ता खुला करुन दिला नाही त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी उपोषनाचे हत्यार उपसले असून गट नंबर १३५ मधुन पाळोदी, सोनुळा, सावरगाव (खु) शिवारातील गट क्रं १३५ मधील ओढयातुन पाणी आंबेगाव (चा) तळयाला जाते सदर ओढा हा पंधरा फुट खोल व तीस फुट रुंद ४ आहे. या ओढयामुळे गट नंबर १३५ मधील शेतीची वहीती आम्हाला करता येत नाही व ओढयातून शेती उपयोगी साहित्य घेऊन जाता येत नाही त्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ प्रकरणकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांचा प्रलंबीत प्रश्न सोडवावा अन्यथा ३० डिसेंबर पासून कार्यालया पुढे अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

सदरील निवेदनावर बाबाराव साखरे, नारायण साखरे, शंकर साखरे, मारोती साखरे, लक्ष्मण साखरे, अर्जुन साखरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मानवत दुचाकी-ऑटो अपघातात युवक ठार

**मानवत / प्रतिनिधी-**मानवत बायपासवरील गजानन मंदिराजवळ दुचाकी व ऑटोच्या धडकेत १९ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.२१) सायंकाळी सुमारे ७ वाजता घडली. मृत युवकाचे नाव सोमेश्वर नारायण फाटे (वय १९, रा. कोथाळा) असे आहे.

सोमेश्वर फाटे हा मानवतहून आपल्या गावी कोथाळा येथे दुचाकीवरून जात असताना गजानन मंदिराजवळ त्याची दुचाकीसमोर असलेल्या ऑटोला मागून धडकली. या जोरदार धडकेत त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर जखमी सोमेश्वरला तातडीने मानवत येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले.

मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच पोलीस हवालदार शरीफ पठाण यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

Made with Xodo PDF Reader and Editor



# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ डिसेंबर**

बीड जिल्ह्यातून प्रस्तावित असलेल्या लातूर-अंबेजोगाई-केज-बीड-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण या लातूर-कल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात बदल करून बीड जिल्ह्याला डावलण्याचा प्रयत्न होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.



परिवहनमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी सदर द्रुतगती मार्ग लातूर-कळंब-पारा-ईट-खर्डा-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण या मार्गाने नेण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर केल्याचे समोर आले आहे. हा प्रस्ताव बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासावर अन्याय करणारा असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

या महामार्गामुळे बीड जिल्ह्यात उद्योगधंदे, रोजगारनिर्मिती तसेच कृषी व कृषीपूरक व्यवसायाला मोठा चालना मिळणार असून शेतकऱ्यांचे उत्पादन मुंबई-ठाणे महानगर प्रदेशापर्यंत जलदगतीने पोहोचू शकणार आहे. त्यामुळे बाजारपेठेचा विस्तार होऊन शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत होणार असताना बीड जिल्ह्याला वगळण्याचा कोणताही निर्णय अन्यायकारक ठरेल, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले.

पूर्वनियोजित लातूर-कल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात कोणताही बदल करू नये, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले. जर नियोजित आराखड्यात बदल करण्यात आला, तर प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणासाठी येणारे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या समोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.या आंदोलनात शेख युनूस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,माजी सैनिक अशोक येड (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी), शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, कुलदीप करपे, गणेश मस्के,प्रा.ज्ञानेश्वर राऊत, सुहास जायभाये, गणेश नाईकवाडे, राजु गायके, अर्जुन सोनावणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# कापूस, सोयाबीन व तूर पिकांना योग्य भाव द्या यासाठी उद्या शेतकरी हक्क मोर्चा




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ डिसेंबर**

राज्यातील शेतकरी सध्या अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीतून जात असून शेतीमालाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झालेली असताना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. विशेषतः कापूस, सोयाबीन व तूर या प्रमुख पिकांचे दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने गुरुवार, दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बीड येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती मोर्चा संयोजकांनी दिली.

शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत -

शेतकऱ्यांच्या कापसाला किमान १२,००० प्रति क्विंटल भाव देण्यात यावा.

सोयाबीनसाठी किमान ७,००० प्रति क्विंटल दर निश्चित करण्यात यावा. कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (CCI) कडून होणारी अडवणूक थांबवून सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात यावा.हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या बाजार समित्या व व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. बाजारात कमी दराने खरेदी झालेल्या शेतमालाचा विक्रीदर व खरेदीदरातील फरक सरकारने अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना भरून द्यावा. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, सबसिडी, अनुदान व पीक विमा यांची थकीत रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. या मागण्यांकडे शासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांमध्ये तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. शेतकरी हक्क मोर्चाला जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# येणारा काळ लोकविश्वास आणि लोक विकासाचा-अमरसिंह पंडित

## भिमकन्येच्या नेतृत्वात नव्या राजकारणाची घडी बसली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ डिसेंबर**



येणारा काळ लोकांनी व्यक्त केलेल्या विश्वासाचा आणि आम्ही दिलेले आश्वासन पूर्तीचा असणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार या कडक शिस्तीच्या नेतृत्वात बीडचा कायापालट आपणाला करायचा आहे, यासाठी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी सज्ज रहावे अशा सूचना नवनिर्वाचितांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी दिल्या. भिमकन्येच्या नेतृत्वात नव्या राजकारणाची घडी यानिमित्ताने बसली असून येणाऱ्या काळात बीड तालुक्यात नव्या दमाच्या नेतृत्वांना संधी देण्याची भुमिका पक्ष घेत असल्याचे सुतोवाच अमरसिंह पंडित यांनी यावेळी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता ताई पारवे आणि २१ नगरसेवकांचा सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. पक्षाच्यावतीने शिवछत्र येथे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न झाला.

बीड नगर परिषद निवडणुकीतील नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता ताई पारवे यांच्यासह २१ नगरसेवकांचा सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थित संपन्न झाला. यावेळी आ. विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष सुहास पाटील, माजी नगराध्यक्ष दिलीपराव गोरे, राजेंद्र राऊत, बळीराम गवते यांच्यासह नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता ताई पारवे, नवनिर्वाचित नगरसेवक फारुक पटेल, शेख निजाम, शेख मुजीब यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शानदार समारंभात लोकनेते सोळंके कारखान्यास पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**तेलगाव दि.२२ डिसेंबर**



तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास जाहीर झालेला ग्रीन वर्ल्ड को प २०२५ हा मानाचा व प्रतिषठेचा पुरस्कार एका शानदार समारंभात नुकताच कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर यांनी स्वीकारला.याबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

सहकार क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कारखाना, संस्थेस ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस को.ऑपरेटिव्ह बॅक लि.पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.त्याप्रमाणे यावर्षीचा जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल दिला जाणारा ग्रीन वर्ल्ड को-ऑ २०२५ हा मानाचा व प्रतिष्ठेचा पुरस्कार लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास जाहीर झाला होता.सदर पुरस्काराचे वितरण पुणे येथे एका शानदार समारंभात करण्यात आले.यावेळी या समारंभास राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत आणि सोळंके कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर यांनी स्वीकारला.याबद्दल कारखाना चेअरमन विरेंद्र दादा सोळंके, व्हा.चेअरमन जयसिंह भैया सोळंके व सर्वांचे अभिनंदन होत आहे.

# नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचा परळीतील डॉक्टरांकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ**
**दि.२२ डिसेंबर**



परळी नगरपालिकेच्या निवडणुकीत भरघोस मतांनी विजय मिळवून नवनिर्वाचित झालेल्या नगराध्यक्ष पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचा परळीतील नामवंत डॉक्टरांच्या वतीने सोमवार, दिनांक २३ डिसेंबर रोजी जाहीर सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी डॉक्टरांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन नगराध्यक्ष पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचा सन्मान करत मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. परळीच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी पुढील काळातही ठोस व लोकाभिमुख निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा उपस्थित डॉक्टरांनी व्यक्त केली.

यावेळी परळीतील प्रसिद्ध डॉक्टर शेवेकर, डॉक्टर वंगे तसेच डॉक्टर विवेक दंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पद्मश्री धर्माधिकारी यांचे पती बाजीराव धर्माधिकारी यांनी त्यांच्या कार्यकाळात परळी शहरात विविध विकासात्मक कामे मार्गी लावली असून, त्याच धर्तीवर नगराध्यक्ष पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनीही परळीच्या विकासाला गती द्यावी, असे मत डॉक्टरांनी यावेळी व्यक्त केले.

हा सत्कार सोहळा परळीतील सामाजिक व वैद्यकीय क्षेत्राचा नगरपालिकेच्या नव्या नेतृत्वावरील विश्वास दर्शवणारा ठरला.

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**
**लिंबागणेश दि.२२ डिसेंबर**

श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान, बेलगाव ता. जि. बीड यांच्या वतीने सन २०२६ या वर्षासाठी प्रकाशित करण्यात आलेल्या 'श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान दैनंदिनी व दिनदर्शिकेचे' प्रकाशन संस्थानचे मठाधिपती महंत महादेव महाराज भारती व शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या शुभहस्ते आज दि. २२ (सोमवार) रोजी बेलेश्वर मंदिरात करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही भक्तांच्या मागणीनुसार प्रकाशित करण्यात आलेली ही सन २०२६ ची दिनदर्शिका आकर्षक व दर्जेदार स्वरूपात तयार करण्यात आली असून, यात श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानातील पवित्र स्थळांची छायाचित्रे, ईश्वरभारती बाबांचे प्रेरणादायी विचार, तसेच धार्मिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक माहितीचा समावेश करण्यात आला आहे.या दिनदर्शिकेत सण-उत्सव, तिथी, धार्मिक कार्यक्रमांची माहिती, स्थानिक विकासकामांचा आढावा व सामाजिक उपक्रमांचा उल्लेख करण्यात आला असून, ही दैनंदिनी भक्तांसाठी उपयुक्त ठरणार आहे.या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) , विक्रम दाभाडे, पांडुरंग वाणी,दिलीप शेळके यांच्यासह संस्थानचे पदाधिकारी, भाविक भक्त व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात भाजपचे ५६ नगरसेवक ना.पंकजाताई धुरंधर

## नगर परिषद निवडणुकीत शंकर देशमुख यशस्वी जिल्हाध्यक्ष ठरले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ डिसेंबर**

नुकताच झालेल्या जिल्ह्यातील नगर परिषद निवडणुकीत भाजपाला मोठे यश मिळाले. अंबाजोगाई, गेवराईत भाजपा तर परळीत युतीचा एक असे तीन नगरध्यक्ष आणि तब्बल ५६ नगर सेवक भाजपचे निवडून आले. लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांचे नेतृत्वाखाली झालेल्या या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची झालेली सभा या दोन्ही नेत्यांवर बीडच्या जनतेने दाखवलेला विश्वास यामुळे मोठा विजय भाजपला मिळाला. या यशा मध्ये सर्वात मोठा वाटा बहाद्दर मतदारांचा आणि कार्यकर्त्यांचा असला तरी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख हे मात्र या निवडणुकीचे खरे यशस्वी जिल्हाध्यक्ष समजले जात आहेत अशी चर्चा सर्वच स्तरात होताना दिसत आहे.

राज्यातील नगर परिषद निवडणूक रणधुमाळी दिवाळी नंतर सुरू होणार असल्याची चर्चा सुरू झाली असतानाच कार्यकर्ते आपापल्या प्रभागात निवडणूक लढविण्याची तयारी करत होते. मात्र जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी दिवाळी पासूनच जिल्ह्यात या निवडणुकीच्या अनुषगाने दौरे सुरू केले. जुन्या नव्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महत्वाचे म्हणजे ज्येष्ठ नागरिकांना भेटून तेथील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती जाणून घेऊन पुढील रणनिती काय असावी यासाठी राज्याच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या वेळोवेळी चर्चा करून योग्य रणनिती आखली. पंकजाताई यांच्या मार्गदर्शनाखाली शंकर देशमुख यांनी नगर परिषद निवडणूक रणनिती आखली आणि त्याचाच फायदा भाजपला बीड जिल्ह्यात मोठे यश मिळाले. शंकर देशमुख हे मुळातच शिस्तबद्ध, सर्वांना सोबत घेऊन चालणारे हसतमुख व्यक्तिमत्व म्हणून त्यांची जिल्ह्यात ओळख आहे. जुने जाणते आणि तरुण कार्यकर्ते या दोघांमध्ये समन्वय साधून ते काम करत असल्याने ते लोकप्रिय जिल्हाध्यक्ष असले तरी अनेक निवडुकांचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या जवळ आहे. निवडुका कशा प्रकारे लढण्यात याव्यात याचा गाडा अभ्यास त्यांना असल्याने त्यांनी नगर परिषद निवडणूक अत्यंत गंभीर पणे लढण्याचे ठरवत परळी, अंबाजोगाई, माजलगाव, धारूर, गेवराई, बीड येथे दिवाळी पासूनच दौरे करत कामाला सुरुवात केली. सुरुवाती पासूनच भेटी घेऊन इच्छुकांच्या सोबत सखोल चर्चा त्यांनी केली. अनेक चांगल्या सक्षम लोकांना भाजपात प्रवेशित केले अर्थात वेळोवेळी ना.पंकजाताई मुंडे यांचे मागदर्शन घेऊनच यांनी निर्णय घेतले.

गेवराई नगर परिषद ही भाजपच्या ताब्यात होती. विधानसभेचे गणित लक्षात घेऊन बाळराजे पवार व माजी मंत्री बदामराव पंडित यांना एकत्र घेऊन गेवराई नगरपालिका भाजपाने मोठा विजय मिळवत नगरध्यक्षसह नगरसेवक निवडून आणले. या निवडणुकीत सर्वात महत्वाचा निर्णय होता तो म्हणजे डॉ.योगेश आणि डॉ.सारिका क्षीरसागर यांचा अगदी निवडणूक प्रक्रिया अंतिम टप्यात आली असताना हा प्रवेश झाला आणि तो भाजपा साठी किती महत्वाचा होता हे शंकर देशमुख यांना माहीत होते. प्रवेश झाला पक्षाला घवघवीत यश मिळाले. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार अटीतटीच्या लढतीत काही मतांनी पराभूत झाल्या असल्या तरी ३२०३३ मते बीड शहरात भाजपला मिळाली नगर सेवकांची संख्या दोन (१५)आकडी झाली हे ही तितकेच महत्वाचे. या प्रवेशासाठी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यावर ना. पंकजाताई मुंडे यांनी विशेष जबाबदारी टाकली होती. ऐनवेळी भाजपचे जुने कार्यकर्ते आणि क्षीरसागर समर्थक उमेदवार यांची सांगड घालण्याची जबाबदारी शंकर देशमुख यांनी पार पाडत अत्यंत खेळीमेळीच्या आणि तितक्याच ताकदीने ही निवडणूक लढवली आणि तब्बल १५ उमेदवार विजयी झाले. काही उमेदवार फार थोड्या मतांनी पराभूत झाले. अंबाजोगाई, गेवराईत भाजपा तर परळीत युतीचा एक असे तीन नगरध्यक्ष आणि तब्बल ५६ नगर सेवक निवडून आले. धारूर मध्ये देखील अत्यंत कमी फरकाने नगरध्यक्ष पदाच्या उमेदवाराचा पराभव झाला.लोकनेत्या ना .पंकजाताई मुंडे यांचे नेतृत्वाखाली झालेल्या या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची झालेली सभा या दोन्ही नेत्यांवर बीडच्या जनतेने दाखवलेला विश्वास यामुळे मोठा विजय भाजपला मिळाला.




बीड जिल्ह्यात कधी नव्हे एवढे ५६ नगरसेवक ना.पंकजाताई यांच्या नेतृत्वाखाली विजयी झाले. जिल्ह्यात पंकजाताईचे मार्गदर्शनाखाली झालेल्या निवडणुकी नंतर मात्र आता शंकर देशमुख यांच्या योग्य नियोजन, शिस्तबद्ध प्रचार, रणनिती यावर जोरदार चर्चा होत आहे. जिल्ह्यातील नगर परिषद निवडणुकीत यशस्वी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख हेच असल्याची चर्चा कार्यकर्ते पदाधिकारी, नागरिकात चांगलीच रंगू लागली आहे.

Made with Xodo PDF Reader and Editor



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात बालविवाह प्रतिबंध कायद्याची जनजागृती

## जिल्हा बालसंरक्षण कक्ष, बहिर्जी स्मारक महाविद्यालयाचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ डिसेंबर**




वसमत तालुक्यातील मौजे जवळा खंदारबन येथील हुतात्मा बहिर्जी स्मारक महाविद्यालयाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिरात जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ विषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.


या कार्यक्रमात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे या व्याख्याते म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी बालविवाहाचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी जिल्हास्तरावरील यंत्रणा, पंचायत विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग तसेच महिला व बाल कल्याण विभाग यांच्या भूमिकेबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग घडवून बालविवाहाबाबत जनजागृती करण्यात आली.

महिला सबलीकरण व बालविवाह ही एक सामाजिक समस्या या विषयावर मार्गदर्शन करताना श्रीमती. कोरडे यांनी महिलांची समाजातील भूमिका, त्यांचे अधिकार, महिला सबलीकरणाची गरज आणि अंतर्गत असमानतेवर मात करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. सक्षम महिला घडल्यास समाज सक्षम होतो, असे प्रतिपादन त्यांनी केले. यासोबतच बालविवाह, त्याची कारणे, दुष्परिणाम व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आली. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार मुलीचे वय १८ वर्षे व मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी विवाह करणे हा कायद्याने गुन्हा असून त्यासाठी एक लाख रुपये दंड व दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा होऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बालविवाह प्रतिबंधासाठी ग्रामीण भागात ग्रामसेवक व शहरी भागात बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून ग्रामस्तरावर ग्राम बाल संरक्षण समिती कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली. बालकांसाठी तात्काळ मदत करणाऱ्या चाईल्ड हेल्पलाईन १०९८ व पोलीस हेल्पलाईन ११२ वर माहिती देण्याचे आवाहन चाईल्ड हेल्पलाईनचे प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे यांनी केले. माहिती देणाऱ्या व्यक्तीची गोपनीयता राखली जाते, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी व गावातील प्रतिष्ठित नागरिकांकडून बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना, दत्तक विधान, अनाथ प्रमाणपत्र याबाबत माहिती देण्यात आली.

यावेळी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ चे समुपदेशक अंकुर पाटोडे, केस वर्कर राजरत्न पाईकराव, महाविद्यालयाचे उपप्राचार्य भोईवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. श्रीकांत गावंडे महिला सहकार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.स्वाती पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी रावसाहेब कल्याणकर, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. समीक्षा कदम यांच्यासह प्राध्यापकवृंद, स्वयंसेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ढोलक्याची वाडी शिवारात ८ फूट लांबीची मगर आढळली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ डिसेंबर**

कळमनुरी तालुक्यातील ढोलक्याची वाडी शिवारातील एका शेतात आठ फुट लांबीची जीवंत मगर दि २३ डिसेंबर रोजी आढळली. गावकरी आणि वन विभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी जाऊन मगर जेरबंद केली.

ढोलक्याची वाडी शिवारात आनंदराव फटींग योचे शेत आहे. त्यांच्या शेतापासून काही अंतरावरच ईसापूर धरण असून एक छोटा कालवा देखील वाहतो. या पाण्याचा ऊसासाठी वापर केला जातो. मागील काही दिवसांपासून त्यांच्या शेतात ऊस तोडणीचे काम सुरू आहे. आज सकाळी कामगार ऊस तोडणी करीत असतांना त्यांना ऊसाच्या फडात मोठी हालचाल जाणवली. कामगारांनी त्या ठिकाणी जाऊन पाहीले असता तेथे जीवंत मगर आढळली.

या प्रकाराची माहीती गावकऱ्यांना कळाल्यानंतर त्यांनी मगरीला पकडण्याचे प्रयत्न केले तर काही गावकऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच विभागीय वन अधिकारी डॉ राजेंद्र नाळे, सहायक विभागीय वन अधिकारी सचिन माने यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार, वन कर्मचारी शिवरामकृष्ण चव्हाण, सुधाकर कऱ्हाळे, सग्राम भालेराव यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अथक परिश्रमानंतर वन विभागाचे पथक आणि गावकरी शामराव ढाकरे, गणपत पाचपुते, बाळू धनवे, भागोराव खुडे यांनी मगरीला दोरीने बांधून ताब्यात घेतले. वन विभागाच्या पथकाने सदर मगरीला वाहनाद्वारे हिंगोली येथे आणले आहे. वन विभाग सदरील मगरीला नैसर्गिक अधीवासात सोडणार आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# हिंगोलीचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची बदली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ डिसेंबर**



हिंगोलीचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची बदली झाली असून त्यांच्या जागी नूतन पोलिस अधीक्षक म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील दहशतवाद विरोधी पथकाचे पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांना नियुक्ती देण्यात आली असून दि २३ डिसेंबर रोजी नूतन पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांचे शासकीय विश्रामगृह येथे आगमन झाल्यानंतर शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांनी स्वागत केले.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी अल्पावधीतच जिल्ह्यातील सराईत गुन्हेगारांवर मोठ्या प्रमाणात कारवाई त्यांना स्थानबध्द केले तसेच अनेकांवर हद्दपारीची कारवाईही केली. तसेच अवैध धंदे, अवैध वाळू माफीयांवर देखील अनेक वेळा कारवाई करीत वाहने जप्त केली. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांनी शांतता समितीच्या बैठका घेऊन सण, उत्सवाच्या काळात चांगली कामगिरी बजावली. अनेक गुन्हे उघडकीस आणले आणि गुन्हेगारांना कठोर शिक्षा केली. अवैध दारू विक्रेत्यांवर त्यांनी कारवाई करीत त्यांना पोलिसी खाक्या वेळोवेळी दाखवला.

ऑपरेशन ऑलआऊट राबवून सराईत गुन्हेगार, फरार आरोपींना जेरबंद करण्याचे कामही पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले. त्यांनी अनेकवेळा स्वत: नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी समजावून घेत परिस्थिती हाताळली. परंतु त्यांना हिंगोली येथे सेवेचा कमी कालावधी मिळाला आहे. नूतन पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांच्यासमोर वाळू माफीया आणि अवैध धंद्यांचे मोठे आवाहन असणार आहे. जिल्ह्यात अवैध धंदे आणि वाळू माफीयाचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले असून राजकीय पाठींबा असल्याने अवैधधंदे पूर्णपणे बंद करणे पोलिस अधीक्षक कोकाटे यांना शक्य झाले नाही.




**हिंगोली– शहरातील रिसाला बाजार जवळील रेल्वे पूलावर वाळूचे टिप्पर अचानक बंद पडल्याने या रस्त्यावरील वाहतुक एक ते दोन तास बंद पडली. या रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. वाहतुकीची कोंडी झाल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. छाया– चंदु वैद्य**

## संक्षिप्त वृत्त

### बालकांना ९० श्रवणयंत्रे विद्यार्थ्यांना वाटप



हिंगोली– राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमाच्या वैद्यकीय पथकाकडून १२५ संदर्भीत आजाराच्या विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. या शिबीराचे आयोजन जिल्हा रूग्णालय येथे करण्यात आले होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ नितीन तडस यांची प्रमुख उपस्थिती होती. कर्णबधीर विद्यार्थ्यांची तपासणी कोल्हापूर येथील डॉ संदेश बागडी, डॉ मोहन कुलकर्णी, काळे यांनी केली. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ दिपक मोरे, बालरोग तज्ञ डॉ गोपाल कदम, डॉ सचिन बोधगिरे, डॉ नितीन पुरोहीत यांची उपस्थिती होती. या शिबीरात ७५ कर्णबधीर विद्यार्थ्याची बहिरेपणा तपासणी करून ९० श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. शिबीरासाठी डॉ नांदूरकर, लक्ष्मण गाभणे, ज्ञानोबा चव्हाण, प्रशांत गिरी तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातील सर्व वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माता, ए एन एम व रूग्णालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### अमृतच्यावतीने मोफत प्रशिक्षण शिबीर



हिंगोली– जिल्ह्यातील महिलांना व युवकांना स्वयंरोजगाराच्या दिशेने सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या अमृत – महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या अमृत– फॅशन डिझायनिंग व ड्रेस मेकिंग या ३० दिवसीय मोफत प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ हिंगोली येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन युवा प्रगतशील उद्योजक राघवेंद्र शिरडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी सुधीर आठवले, अमृत सखी, अमृत मित्र, प्रशिक्षणार्थी लाभार्थी तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच अमृतचे राज्य व्यवस्थापक दिपक जोशी यांनी ऑनलाइन माध्यमातून लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# अवैध गौणखनिज उत्खनन प्रकरणातील जप्त वाहनांचा जाहीर लिलाव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ डिसेंबर**

स्टोन क्रशर खदानीमधून अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणात जप्त करण्यात आलेल्या जंगम मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती तहसील प्रशासनामार्फत देण्यात आली आहे. अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणात जप्त वाहने सोडविण्याबाबत संबंधित कसूरदारांना वारंवार कळवूनही दंडाची रक्कम शासनाकडे जमा करण्यात आलेली नाही. तसेच जप्त केलेली जंगम मालमत्ता सोडविण्यासाठी संबंधित मालक पुढे न आल्याने एकूण सहा खदानधारकांकडील जे.सी.बी., क्रशर मशीन व इतर वाहने जाहीर लिलावाद्वारे विक्रीस काढण्यात येत आहेत.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, हिंगोली यांच्याकडील दि. १९ डिसेंबर २०२५ च्या पत्रानुसार या जंगम मालमत्तेची लघुत्तम किंमत निश्चित करण्यात आली असून, त्यानुसार अटी व शर्तींच्या अधीन राहून जाहीर लिलावाची नोटीस देण्यात आली आहे.

या जंगम मालमत्तेचा जाहीर लिलाव दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या कालावधीत महसूल मंडळ बासंबा, भांडेगाव, डिग्रस कऱ्हाळे अंतर्गत असलेल्या स्टोन क्रशर खदानींच्या ठिकाणी बोली पद्धतीने होणार आहे. इच्छुकांनी लिलावामध्ये सहभागी होण्यासाठी दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत तहसील कार्यालय, हिंगोली येथील गौण खनिज विभागात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज व प्रती वाहन रुपये १० हजार अनामत रक्कम सादर करणे बंधनकारक राहील.

ज्या मालकांनी दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत दंडात्मक रक्कम भरली असल्यास त्यांना बंधपत्रावर संबंधित वाहन ताब्यात देण्यात येईल. लिलावात उच्चतम बोली लागलेल्या वाहनांचा ताबा संपूर्ण रक्कम भरल्यानंतर देण्यात येणार असून, वाहन उचलण्याचा व नोंदणीसंबंधीचा सर्व खर्च लिलावधारकाने स्वतः करावयाचा आहे. लिलाव प्रक्रियेसंदर्भात सर्व अधिकार उपविभागीय अधिकारी, हिंगोली व तहसीलदार, हिंगोली यांनी राखून ठेवले असून, आवश्यकतेनुसार अटी व शर्तींमध्ये बदल, लिलाव मंजूर अथवा रद्द करण्याचा अधिकारही प्रशासनाकडे राहणार आहे,असे तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

# पवार पब्लीक स्कूलमध्ये गणित दिनानिमित्त गणितीय मॉडेल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ डिसेंबर**



येथील पवार पब्लिक स्कूल मध्ये राष्ट्रीय गणित दिवसाचे आवचित्य साधून विद्यार्थ्यांनी सोमवारी विद्यार्थ्यांनी त्रिकोण, चौकोन असे गणितीय मॉडेल सादर करून गणित दिवस साजरा केला.

पवार पब्लिक स्कुल मध्ये देखील बाल वैज्ञानिक निर्माण व्हावा यासाठी शिक्षकांकडून प्रेरणा दिली जाते. त्यानुसार विद्यार्थ्यांनी गणित दिनी त्रिकोण, षटकोन, चौकोन, पिऱ्यामिड असे गणितीय उपकरणा द्वारे मॉडेल तयार करून आणले होते. त्याबद्दल विद्यार्थ्यांनी माहीती दिली.

यावेळी शाळेचे संचालक प्रणव पवार, सचिन धामणे, सचिन इंगोले, संतोष पाईकराव, पंकज इंगोले, जॉबिन, योगेश थोरात,गजानन वानरे, मस्के, सॉली जॉबिन, अपर्णा जामकर, फिजा, अश्विनी बोराळकर, कोमल अग्रवाल, दिपाली राऊत, दिपाली मुधीराज, रुपाली ठाकरे, छाया धनवे आदींची उपस्थिती होती.

गणित विषय हा विद्यार्थ्यांना अवघड वाटू नये तो विषय खेळीमेळीच्या वातावरणातून विविध खेळाच्या प्रात्यक्षिकातून सहज सोपा व्हावा हा दृष्टीकोन डोळ्या समोर ठेवून पवार पब्लिक स्कुल सातत्याने प्रयत्न करीत आहे. या शैक्षणिक साहित्यातून प्रत्येक विद्यार्थी गणित तज्ञ् झाला पाहिजे हा उद्देश आहे. विज्ञान आणि गणितातच विद्यार्थी आतापासून ध्येय साध्य केल्यास पुढे चालून तो वैज्ञानिक बनू शकतो असे मार्गदर्शन गणित शिक्षकांनी केले.

# एकाच वर्षात जिल्हा परिषद षटकोनी सभागृहाची दुरावस्था

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ डिसेंबर**



येथील जिल्हा परिषद कार्यालय परिसरातील षटकोनी सभागृहाची मागील वर्षी लाखो रूपये खर्च करून दुरूस्ती करण्यात आली होती. परंतु एकाच वर्षात सभागृहाचे सिलींग पॅड गळून पडतांना दिसत आहेत. निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे एकाच वर्षात दुरावस्था झाल्याचे दिसत आहे.

येथील जिल्हा परिषदेच्या बैठका, सर्वसाधारण सभा आदींसाठी जिल्हा परिषद कार्यालयाच्या परिसरात षटकोनी सभागृह बांधण्यात आले आहे. सध्या या षटकोनी सभागृहात बैठका होत नसल्यामुळे याकडे जिल्हा परिषद प्रशासन गांभीर्याने पहात नसल्याचे दिसत आहे.

मागील वर्षी लाखो रूपये खर्च करून या सभागृहात छताची सिलींग, सभागृहातील फर्निचर तसेच इतर कामे करण्यात आली होती. एक वर्ष उलटले नाही तोच या सभागृहातील छताचे सिलींग पॅड आपोआप गळून पडतांना दिसत आहेत. कामाचा निकृष्ट दर्जा असल्यामुळे एकाच वर्षात षटकोनी सभागृहाची दुरावस्था पहायला मिळत आहे. शासनाचे लाखो रूपये पाण्यात गेल्याची चर्चा जिल्हा परिषद वर्तुळात होत आहे. संबंधीत कंत्राटदारांवर काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# हिंगोलीत आर्ट ऑफ लिवींगचे नव चेतना शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ डिसेंबर**



शहरात आर्ट ऑफ लिविंग परिवारा तर्फे नवचेतना शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दि १९ ते २१ डिसेंबर या कालावधीत सकाळी सहा ते आठ या वेळेत सह्याद्री हॉस्पिटल हॉल, कोथळज रोड येथे करण्यात आले होते या शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरात आर्ट ऑफ लिविंगचे स्वामी शरणानंद यांनी मार्गदर्शन केले. या शिबिरात योग, प्राणायाम, ध्यान, ज्ञान इत्यादी बाबतीत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच प्रात्यक्षिक देखील करून घेण्यात आले. शहरातील १५० पेक्षा जास्त लोकांनी या शिबिराचा लाभ घेतला. स्वामी शरणानंद यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली तालुक्यातील खंडाळा येथे सायंकाळी सहा ते आठ या वेळेत पदयात्रा व सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी खंडाळा येथील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पदयात्रेमध्ये प्रत्येक घरी अंगणात रांगोळी काढून व स्वामीजींची पाद्य पूजा करून स्वागत करण्यात आले. गावातील ३५० ते ४०० जण या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर्ट ऑफ लिविंग हिंगोली परिवाराचे सर्व प्रशिक्षक व स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

Made with Xodo PDF Reader and Editor



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतात काम करणाऱ्या महिलेवर बिबट्याचा हल्ला मुंडके जबड्यात पकडल्याने महिला गंभीर

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २३ डिसेंबर-**

माहूर तालुक्यातील बामनगुडा येथील शेतात काम करणाऱ्या एका महिलेवर बिबट्याने अचानक हल्ला करून महिलेचे तोंड जबड्यात धरून चावा घेतल्याने महिला गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक आणि भीतिदायक घटना आज २३ रोजी दुपारी घडल्याने खळबळ उडाली आहे. बिबट्याच्या तावडीतून सुटलेल्या गंभीर जखमी महिलेस नजिकच्या सिंदखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करून माहूर ग्रामीण रुग्णालयामार्फत पुढील उपचारासाठी यवतमाळला हलविण्यात आले आहे. ही धक्कादायक घटना ऐण दुपारी २ वाजताच्या सुमारास घडल्याने शेतकऱ्यासह नागरिकात



प्रचंड दहशत निर्माण झाली असून नरभक्षी बिबट्याला तात्काळ जेर बंद करण्याची मागणी होत आहे.

माहूर तालुक्यात अनेक बिबटे पिल्लांसहित धुमाकूळ घालत असून, आतापर्यंत बिबट्याने नागरिकावर हल्ला केला नव्हता परंतु आज बामनगुडा येथील शेतात काम करणारी महिला लता सुरेश तोडसाम वय ३५ ही आपले पती,मुलगा आणि एका शेतशेजाऱ्या सोबत कापूस वेचण्याचे काम करत होती. तितक्यात काही काम निघाल्याने पती सुरेश तोडसाम हे घरी गेले. तितक्यातच शेताला लागून असलेल्या जंगलातून बिबट्याने सदरील महिलेवर अचानकपणे झडप घालून महिलेचे मुंडके जबड्यात पकडून कडाडून चावा घेतल्याने महिलेला गालावर गंभीर जखम झाली तर कपाळावर तसेच मानेवरही मोठ्या प्रमाणात त्याचे दात खोल रुतल्याने जीवघेण्या जखमा झाल्या. घटना पाहून मुलाने आणि शेजाऱ्याने जोरात आरडा ओरड केल्याने महिलेला सोडून बिबट्याने जंगलात पळ काढला त्यामुळे महिलेचा जीव वाचला.

मुलाने घटना वडीलांना कळविल्याने त्यांनी लगेच शेतात धाव घेत महिलेला घरी आणून सिंदखेडच्या प्रथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले असता येथे डॉ.बी.एम. मोरे यांनी प्रथमोपचार करून माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवले. येथे डॉ. मंगेश नागरगोजे, ब्रदर निलेश भिलावेकर, कक्षसेवक तुळशीदास शेंडे, सुरक्षारक्षक आकाश मुंडे यांनी उपचार करून १०८ द्वारे डॉ. सत्यम गायकवाड, चालक सिद्धार्थ भालेराव यांचे निगराणीत यवतमाळला येथे पुढील उपचारासाठी पाठवले.

महिलेवर हल्ला करून बिबट्या नरभक्षी झाल्याने त्याला तात्काळ जेर बंद करावे, अशी मागणी नागरिकांतून होत असून ,वन विभागाने तात्काळ उचित उपाययोजना करणे गरजेचे झाले आहे.अन्यथा! एखाद्या नागरिकाचा जीव जाण्याची शक्यता आजच्या या घटनेवरुन नाकारता येत नाही.

# पशुपालक व दुग्ध व्यवसायिकांसाठी माळेगाव यात्रा प्रेरणास्थान: आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ डिसेंबर-**

श्रीक्षेत्र माळेगावची यात्रा ही जगातली आगळी-वेगळी यात्रा असून ती कृषी व पशुसंवर्धनासाठी विशेषतः प्रसिद्ध आहे. या यात्रेत दरवर्षी उत्कृष्ट दर्जाची पशुधन प्रदर्शने भरतात. यावर्षी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध पशु व दुग्ध स्पर्धांना शेतकरी व पशुपालकांचा मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी स्पर्धांच्या पारितोषिक रकमेत वाढ करण्यात आली असल्याचे सांगत, पूर्वीप्रमाणे माळेगाव यात्रेत घोडा, गाढव व उंट यांच्या शर्यती पुन्हा सुरू व्हाव्यात, अशी अपेक्षा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केली.

आज माळेगाव येथे आयोजित कार्यक्रमात विविध पशु व दुग्ध स्पर्धेतील विजेत्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे, लोहा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष शरद पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा यात्रा सचिव डी.बी. गिरी, सरपंच प्रतिनिधी हनमंत धुळगंडे, दत्ता वाले, रोहित पाटील, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, डॉ. प्रवीणकुमार घुले आदी मान्यवर उपस्थित होते.

माळेगावची यात्रा अधिक व्यापक स्वरूपात वाढावी यासाठी प्रयत्न सुरू असून, यावर्षी जिल्हा परिषदेने अचूक नियोजन केल्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सांगितले. पुढील वर्षी दुग्ध व्यवसायात वाढ व्हावी तसेच शेतकऱ्यांना जोडधंद्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी विविध खाजगी दूध डेऱ्यांचा



सहभाग घेतला जाणार असल्याचेही आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी केले. यावेळी लाल कंधारी व देवणी नर-मादी गटाचे चॅम्पियन तसेच विविध स्पर्धांमध्ये क्रमांक पटकावलेल्या स्पर्धकांना रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पहार देऊन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

दुग्ध स्पर्धेसाठी नमस्कार दूध डेअरी, मस्कटी दूध डेअरी व एपीएस दूध डेअरी यांनी पुढाकार घेतला. यासाठी संग्राम गाडेकर, नितीन शिंदे व सतीश कोगनळे यांनी विशेष सहकार्य करत दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले.

**पशुधनाचे शास्त्रशुद्ध संगोपन करावे : जिल्हाधिकारी कर्डिले**

शेती क्षेत्रात नवनव्या तंत्रज्ञानाचा वापर वाढत असला तरी पशुधनांची संख्या कमी होत चालली आहे.पशुपालकांनी पशुधनांची संख्या वाढवून त्यांच्या आरोग्याची योग्य निगा राखावी व शास्त्रशुद्ध संगोपन करावे. दुग्ध व्यवसाय आणि पशुसंवर्धन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ असून अशा यात्रांमधून शेतकऱ्यांना नवी दिशा मिळते, असे मत यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी व्यक्त केले.

## कर्मयोगी बाबासाहेब देशमुख कृषिवेद युवा पुरस्कारसाठी प्रस्ताव पाठवावेत

**बिलोली-** मराठवाड्यातील प्रयोगशील युवा शेतकरी व कृषी उद्योजकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सगरोळी (ता. बिलोली) येथील संस्कृती संवर्धन मंडळाच्या कृषी विज्ञान केंद्रातर्फे दरवर्षी 'कर्मयोगी बाबासाहेब देशमुख कृषिवेद युवा शेतकरी व युवा कृषी उद्योजक पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी मराठवाडा विभागातून नामांकने मागविण्यात येत असून, इच्छुकांनी आपले प्रस्ताव १० जानेवारीपर्यंत पाठवावेत, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्रातर्फे करण्यात आले आहे. आजची युवा पिढी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करत आहे. अशा कर्तृत्ववान, प्रयोगशील आणि प्रेरणादायी युवा शेतकऱ्यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने हे पुरस्कार सुरू करण्यात आले आहेत. हे पुरस्कार दरवर्षी सगरोळी येथे कृषी विज्ञान केंद्रातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या तीन दिवसीय 'कृषिवेद' या भव्य कृषी तंत्रज्ञान महोत्सवात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील. यावर्षी 'कृषिवेद २०२६' हा कार्यक्रम दि. २७ व २८ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला असून, याच कार्यक्रमात प्रथमच हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावर्षी कर्मयोगी बाबासाहेब देशमुख कृषिवेद युवा शेतकरी पुरस्कार २०२६ (पुरुष/महिला) व कर्मयोगी बाबासाहेब देशमुख कृषिवेद युवा कृषी उद्योजक पुरस्कार (पुरुष/महिला) ह्या दोन प्रमुख श्रेणींमध्ये पुरस्कार दिले जाणार आहेत. या दोन्ही श्रेणींसाठी वयोमर्यादा २५ ते ४० वर्षे असून, प्रत्येक विजेत्यास रु. ११,००० रोख रक्कम व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. मराठवाडा विभागातील शेतकरी, कृषी व्यावसायिक, कृषी स्टार्टअप्स, शेतकरी उत्पादक कंपन्या (ऋझज), फळ प्रक्रिया उद्योग तसेच कृषी क्षेत्रात कार्य करणारी कोणतीही व्यक्ती या पुरस्कारासाठी अर्ज करू शकते. इच्छुकांनी आपला प्रस्ताव संपूर्ण माहिती, कार्याचे छायाचित्रे व प्रसिद्धी कात्रणांसह खाली दिलेल्या पोस्ट, ई-मेल किंवा व्हॉट्सपद्वारे पाठवावेत असे कृषी विज्ञान केंद्रातर्फे कळविण्यात आले असून, अपूर्ण प्रस्ताव स्वीकारले जाणार नसल्याचे सांगण्यात आले.

## येवली येथे मोफत कराटे शिबिर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २३ डिसेंबर-**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत येवली ता. हदगाव यांनी दि.२३.१२.२०२५ रोजी गावातील मुला मुली करता मोफत कराटे शिबिराचे आयोजन जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येवली येथे आयोजित केले होते. या शिबिरास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला येणाऱ्या काळात मुला मुलींना स्वतःचे संरक्षण करण्यासाठी प्रमुख प्रशिक्षक आकाश भोरे व महिला प्रशिक्षक अनुष्का जाधव यांनी मुला - मुलींना माहिती दिली. महिला सक्षमीकरण काळाची गरज आहे तसेच प्रत्येक मुलीला व महिलांना स्वतःची आत्मरक्षा करता आली पाहिजे या दृष्टिकोनातून आयोजित करण्यात आला होता.त्यामुळे मुला मुलींच्या मनामध्ये उत्साह निर्माण झाला व पुढील कराटे शिकण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले या कार्यक्रमासाठी येवली येथील जिल्हा परिषदेचे सर्व शिक्षक कर्मचारी यांचे सहकार्य लाभले तसेच हा कार्यक्रम ग्रामपंचायत येवली येथील सरपंच सौ. शितल गजानन कंठाळे यांनी आयोजित केला होता.

## केरबाजीअप्पा भिमेवार यांचे निधन

**मुदखेड** -तालूक्यातील बारड नगरीचे माजी उपसरपंच केरबाजीअप्पा परबताअप्पा भिमेवार यांचे दी.२१ डिसेंबर रोजी रविवारी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली,सुना, नातु, पणतू असा मोठा परिवार आहे.

बारड येथील सामाजिक कार्यकर्ते प्रभाकरअप्पा भिमेवार, राजुअप्पा भिमेवार,सुरेशअप्पा भिमेवार यांचे ते वडील तर ग्रामपंचायत सदस्या इंदुताई भिमेवार यांचे ते सासरे होत.

# अपक्ष उमेदवारांनी केला माजी नगराध्यक्षाचा पराभव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ डिसेंबर-**

नगरपरिषदेमध्ये गूंठेवारी फेरफार बांधकाम परवानगी सह विविध प्रकरणे निकाली काढताना जनतेसमोर निर्माण झालेल्या अडचणी कामे करुन घेण्यासाठी झालेली अर्थीक लूट नगरपरिषदेच्या कारभाराबद्दल जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष हा प्रभाग क्र.१मध्ये निवडणूकीच्या मैदानात उतरलेले माजी नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर यांना पराभूत करणारा ठरल्याची चर्चा भोकर च्या राजकिय वर्तूळात आहे.

भोकर नगरपरिषदेच्या निवडणूकीत खा.अशोकराव चव्हाण यांचे विश्वासू मानल्या गेलेले माजी नगराध्यक्ष विनोद चिंचाळकर हे प्रभाग क्र.१ मध्ये भविष्य अजमावित होते त्यांचे विरोधात अपक्ष उमेदवार साईप्रसाद जटालवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जवाजोद्दीन बरबडेकर शिवसेनेचे प्रमोद देशमूख कॉंग्रेस एमआयएम आदि



पक्षाचे उमेदवार निवडणूक लढवित होते.अपक्ष उमेदवार साईप्रसाद यांनी प्रभागातल्या सर्व सामान्य मतदारांपर्यत जावून आपली ओळख सांगीतली निवडून आल्यानंतर यापूढे नगरपरिषदेच्या माध्यमातून प्रभागाचा विकास करण्याची ग्वाही मतदारांना देण्यात आली भागातील प्रश्न सोडविणे हे माझे कर्तव्य असल्याचे देखील मतदारांना सांगीतले मतदारांनी यावेळी मात्र नवखा उमेदवार शोधला आणि या प्रभागातून दोन्ही भाजपाच्या उमेदवारांना पराभवाला सामेरे जावे लागले. जनतेच्या मनात आल्यावर काय होवू शकते हे प्रभाग क्र.१ च्या निकालावरुन पहावयास मिळाले. सामाजीक भान असलेले समाजसेवेचे व्रत घेवून पूढे आलेल्या उमेदवारांना चांगले दिवस नक्कीच असणार असल्याचेही या निकालावरुन स्पष्ट झाले. भोकरकरांनी या प्रभागाकडे विशेष लक्ष दिल्याचे निदर्शनास आले.

## जनार्धन गुपिले यांची महाराष्ट्र हँडबॉल असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड

**नवीन नांदेड-** महाराष्ट्र राज्य हँडबॉल असोसिएशनच्या नुकत्याच झालेल्या २०२५ -२६ या कालखंडासाठी नाशिक येथे निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत उपाध्यक्षपदी नांदेड सिडको येथील रहिवाशी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जनार्धन गुपिले यांची बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्य हँडबॉल असोसिएशनच्या निवडणुकीत



नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जनार्धन गुपिले यांची बिनविरोध निवड झाली आहे ही निवडणूक हँडबॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या अधिपत्याखाली नाशिक येथील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मारक येथे पार पडली. या निवडणुकीत सेवानिवृत्त न्यायमूर्ती भगवंतराव गायकवाड यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले तर हँडबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव डॉ. प्रीतपाल सिंग सलुजा हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्र हँडबॉल असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जनार्धन गुपिले यांची सर्व स्तरातून अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## तालुक्याच्या ठिकाणी शिकाऊ व पक्के अनुज्ञप्ती शिबिराचे आयोजन

**नांदेड** - प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे शिकाऊ व पक्के अनुज्ञप्तीसाठी माहे जानेवारी ते जून २०२६ या महिन्यात तालुका शिबिर कार्यालयाचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी जागा उपलब्धतेच्या आधीन राहून ऑनलाईन अपॉईटमेंट महिना सुरुवात होण्याच्या ५ दिवस आधी कार्यालयीन वेळेत सुरु करण्यात येईल. तरी अपॉईटमेंट घेतलेल्या अर्जदारांनी यांची नोंद घेवून शिबिर कार्यालयास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय शिवराम अहिरे यांनी केले आहे. तालुकानिहाय कॅम्पचे ठिकाण व दिनांक पुढीलप्रमाणे आहे. कंधार येथे २ जानेवारी, ३ फेब्रुवारी, ४ मार्च, ३ एप्रिल, ४ मे, ३ जून २०२६ या दिवशी आहे. धर्माबाद येथे ५ जानेवारी, ५ फेब्रुवारी, ६ मार्च, ६ एप्रिल, ६ मे, ५ जून २०२६ यादिवशी करण्यात आले आहे. किनवट येथे ९ जानेवारी, ९ फेब्रुवारी, ९ मार्च, ९ एप्रिल, ११ मे, १० जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. मुदखेड येथे १३ जानेवारी, १३ फेब्रुवारी, १३ मार्च, १३ एप्रिल, १३ मे, १२ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. माहूर येथे १६ जानेवारी, १६ फेब्रुवारी, १६ मार्च, १५ एप्रिल, १५ मे, १५ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. हदगाव येथे १९ जानेवारी, १८ फेब्रुवारी, १८ मार्च, १७ एप्रिल, १८ मे, १८ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. धर्माबाद येथे २३ जानेवारी, २३ फेब्रुवारी, २३ मार्च, २३ एप्रिल, २२ मे, २२ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. हिमायतनगर येथे २८ जानेवारी, २५ फेब्रुवारी, २७ मार्च, २७ एप्रिल, २६ मे, २५ जून २०२५ रोजी करण्यात आले आहे. किनवट येथे ३० जानेवारी, २७ फेब्रुवारी, ३० मार्च, २९ एप्रिल, २९ मे , २९ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे. शिकाऊ व पक्क्या अनुज्ञप्तीसाठी तालुक्याच्या ठिकाणी मासिक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच वरील शिबिराच्या दिवशी स्थानिक सुटटी जाहीर झाल्यास अथवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास शिबिराच्या तारखेमध्ये बदल होवू शकतो याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असेही प्रसिध्दीपत्रकान्वये कळविले आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या मुलाखतींना उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ डिसेंबर-**

नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज घेण्यात आलेल्या उमेदवारांच्या मुलाखतींना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल ८१ जागांसाठी १६५ इच्छुक उमेदवारांनी पक्षाकडे उमेदवारीसाठी मागणी केली असून, यामुळे वंचित बहुजन आघाडीची संघटनात्मक ताकद आणि जनाधार अधिक ठळकपणे समोर आला आहे.

आज शिवाजीनगर येथील हॉटेल विसावा येथे या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच उमेदवारांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. महानगरपालिका क्षेत्रातील जवळपास सर्वच प्रभागांतून इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी हजेरी लावली होती. विशेष म्हणजे मुस्लिमबहुल प्रभागांतून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याने पक्षाच्या सामाजिक समावेशकतेचा आणि अल्पसंख्याक समाजातील विश्वासाचा प्रत्यय आला आहे.

या मुलाखती वंचित बहुजन आघाडीच्या निवडणूक निवड समितीच्या माध्यमातून घेण्यात आल्या. निवड समितीमध्ये अविनाश भोसीकर, फारुख अहमद, इंजि. प्रशांत इंगोले, श्याम कांबळे, महानगर अध्यक्ष विठ्ठल गायकवाड तसेच आयूब खान यांचा समावेश होता. प्रत्येक उमेदवाराची सामाजिक बांधिलकी, कार्यक्षमता, प्रभागातील जनसंपर्क, पक्षाशी असलेली निष्ठा आणि निवडणूक लढविण्याची तयारी या मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी पक्षाचे विभागीय सदस्य डॉ. संघरत्न कुरे, महानगर महासचिव अमृत नरंगलकर, मोहम्मद कासिम, उत्तम धर्मेकर, अशोक काकांडीकर, शेख बिलाल आदी पदाधिकाऱ्यांनी मुलाखती यशस्वी पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. मुलाखतीची संपूर्ण प्रक्रिया शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने पार पडली.

वंचित बहुजन आघाडीने यावेळी तरुण, सामाजिक कार्यकर्ते, महिलांबरोबरच वंचित, उपेक्षित आणि अल्पसंख्याक घटकांना प्राधान्य देण्याची भूमिका स्पष्ट केल्याचे सूत्रांनी सांगितले. अनेक प्रभागांतून नव्या चेहऱ्यांनी उत्साहाने उमेदवारी मागितल्यामुळे पक्षाला पर्यायांची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

मुलाखतीनंतर बोलताना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, वंचित बहुजन आघाडी ही सर्वसामान्य नागरिकांचा आवाज असून, महानगरपालिकेत खऱ्या अर्थाने लोकांचे प्रश्न मांडणारे प्रतिनिधी निवडून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. उमेदवारांची निवड करताना जाती, धर्मापेक्षा कार्यक्षमता, जनसेवा आणि पक्षनिष्ठेला प्राधान्य दिले जाईल. एकूणच नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने जोरदार तयारी सुरू केल्याचे या मुलाखतींमधून स्पष्ट झाले असून, आगामी निवडणुकीत पक्ष ताकदीने मैदानात उतरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# आर्थिक व्यवहारातून जीवन पाटील घोगरे यांचे अपहरण करून मारहाण

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २३ डिसेंबर-**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या अजित पवार गटाचे प्रदेश महासचिव तथा मनपाचे माजी विरोधी पक्ष नेता जीवन पाटील घोगरे यांच्या गाडीवर दगडफेक करून. त्यांना मारहाण करत आरोपीने आपल्या गाडीतून अपहरण करून अज्ञात ठिकाणी नेऊन मारहाण करण्याची घटना दिनांक २२ डिसेंबर रोजी दुपारी बाराच्या सुमारास घडली ही घटना आर्थिक व्यवहाराच्या वादातून घडल्याची माहिती मिळाली्. या घटनेतील सात आरोपींना नांदेड ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेऊन राष्ट्रवादीच्या आजी-माजी आमदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश महासचिव नेहमीप्रमाणे आपल्या घरून स्वतःच्या इनोव्हा कार मधून अण्णाभाऊ साठे चौक सिडको येथून ते ज्ञानेश्वर नगर कडे जात असताना. येथील बडोदा बँकेच्या समोर त्यांच्या कारला स्कार्पिओ आडवी लावून जीवन पाटील घोगरे यांच्या कारवर दगडफेक करून त्यांना मारहाण करत. त्यांच्या गाडीतून ओढून काढून आरोपींनी आपल्या स्कार्पियो मध्ये टाकून पसार झाले. ही



सर्व घटना बडोदा बँकेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. सदरील फुटेच्या आधारे पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांनी तपासाची चक्रे फिरवून शोधाशोध करण्यात आली. संजय पाटील घोगरे यांनी आपले राजकीय पाठबळाचा वापर करून जिल्ह्यातील पोलीस प्रशासनास तातडीने कामाला लावल्याने मोठा अनर्थ टळला. तरीही आरोपीने जीवन घोगरे यांना मोठ्या प्रमाणात मारहाण केली. पोलिसांच्या सतर्कतेमुळे आरोपीने आपला बचाव करण्यासाठी अपहरण केलेल्या जीवन पाटील घोगरे यांना मारहाण करून मुसलमान वाडी परिसरात सोडून पळ काढला पण पोलिसांनी सर्वत्र नाकेबदी केल्याने लोहा पोलीस ठाणे हद्दीत स्कार्पिओ आणि सात आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले्.

जीवन घोगरे पाटील यांनी नांदेड ग्रामीण ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार आमदार प्रताप पाटील चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांच्यासोबत माझा आर्थिक व्यवहार होता. त्यातूनच व राजकीय वैमन्यशातून माझे अपहरण करून मला व माझ्या कुटुंबीयास जीवे मारण्याची धमकी वरील लोकांकडून वारंवार येत होती्. असे घोगरे यांनी आपल्या तक्रारी त नमूद केले आहे. सदरील प्रकरणात आरोपी शुभम सुनेवाड रा. वसरणी, राहुल दासरवाड रा. मालेगाव, कौस्तुभ रणवीर रा.भावसार चौक नांदेड, विवेक सूर्यवंशी रा. गणेश नगर नांदेड, माधव वाघमारे गणेश नगर नांदेड, मोहम्मद अफरोज रा. गिरगाव तालुका वसमत, देवानंद भोळे रा. नांदुसा त नांदेड त्यांच्याविरुद्ध ११८(१ ) ३ ५२,३५२(२),३५१(२),३५१(३),४९ ,१४०(३),१८९(२),१५१(२),१९१(३) कलम अधिनियमानुसार गुन्हा दाखल झाला आहे याप्रकरणी तपास पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, उपाधीक्षक प्रशांत शिंदे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड हे पुढील तपास करीत आहेत.

# माहूर येथे ३० बेडचे आयुष हॉस्पिटल उभारणार !

## केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांचे आश्वासन

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २३ डिसेंबर-**

आमदारकी मेहकर (विधानसभा) आणि खासदारकी (बुलढाणा लोकसभा) दोन्हीची हॅटट्रिक करण्याचा पराक्रम साधणारे शिवसेनेचे मातब्बर नेते केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार ना. प्रतापराव गणपतराव जाधव यांनी आज माहूरगडावर देवदर्शनानिमित्त भेट दिली.यावेळी माहूर येथे ५० खाटांचे शासकीय रुग्णालय मंजूर करावे, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव




जाधव यांच्याकडे केली असता जागेची उपलब्धता असल्यास माहूर येथे ३० बेडचे आयुष हॉस्पिटल उभारता येईल, असे सकारात्मक आश्वासन मंत्री महोदयांनी दिले आहे.

माहूर शहरासाठी अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या उपजिल्हा रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटरची मागणीच्या पार्श्वभूमीवर तिर्थक्षेत्र म्हणून देवदर्शनासाठी दररोज हजारो भाविकांची ये-जा आणि दुर्गम डोंगराळ कठीण घाट वळणाची भौगोलिक परिस्थिती यामुळे अपघातांचे दिवसेंदिवस वाढत चाललेले लक्षणीय प्रमाण पाहता माहूर येथे रुग्णांना तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी ५० खाटांचे शासकीय रुग्णालय मंजूर करावे, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे केली असता जागेची उपलब्धता असल्यास माहूर येथे ३० बेडचे आयुष हॉस्पिटल उभारता येईल, असे सकारात्मक आश्वासन मंत्री महोदयांनी दिले.

आज दिनांक २३ डिसेंबर रोजी देवदर्शनाच्या निमित्ताने केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव माहूर येथे आले असता, स्थानिक विश्रामगृहावर नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी त्यांची भेट घेऊन माहूर तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेची सविस्तर माहिती दिली.माहूर हे जागतिक कीर्तीचे तीर्थक्षेत्र असून शहराची लोकसंख्या सुमारे २५ हजार आहे. तसेच तालुक्यातील ९२ गावांतील सुमारे २ लाख नागरिक व भाविक आरोग्य सेवांसाठी माहूरवर अवलंबून आहेत. सध्या येथे केवळ एकच शासकीय ग्रामीण रुग्णालय असून ते अपुरे पडत आहे.

तालुक्यातील गोरगरीब नागरिकांसह दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना तातडीच्या व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी माहूर येथे मोठ्या क्षमतेचे रुग्णालय आवश्यक असल्याचे नगराध्यक्षांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले.त्यावर मंत्री प्रतापराव जाधव यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, योग्य जागा उपलब्ध झाल्यास माहूर येथे ३० बेडचे आयुष हॉस्पिटल उभारण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील, असे सकारात्मक आश्वासन दिले.